विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

वर्ष चौथे । अंक आठवा । ऑगस्ट २०२५



# महा. अंनिसचे विविध उपक्रम



सामाजिक न्याय दिन, इस्लामपूर (सांगली)
राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे, डॉ. नितीन शिंदे व साथी



जिल्हा प्रेरणा मेळावा (धुळे)



अंनिसकडून पोलिस स्टेशनमध्ये निवेदन व कारवाईची मागणी (परळी)



कार्यकर्ता शिबीरात मानसिक आरोग्य या विषयावर मांडणी करताना अतुल बडवे



जोविनि प्रशिक्षण शिबीर (सोलापूर)



जिल्हा प्रेरणा मेळावा (पुणे)



कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर (बीड)



विवाहित जोडप्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ (नागपूर)

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

संपादक मंडळ

• **संपादक**
डॉ. नितीन शिंदे

• **कार्यकारी संपादक**
उत्तम जोगदंड

• **सहसंपादक**
डॉ. श्यामसुंदर मिरजकर

• **व्यवस्थापकीय संपादक**
अजय भालकर

• **सदस्य**
डॉ. बाळू दुगडूमवार
प्रल्हाद मिस्त्री
राजेंद्र फेगडे
हंसराज महाले

• **सल्लागार**
किशोर बेडकिहाळ

• **प्रकाशक**
संजय बनसोडे

• **कार्यालयीन पत्ता**
**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव
पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर
ता. वाळवा, जि. सांगली ४१५४०९
मो. ९३५९०८०८२०
email : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

• **अंक वितरण**
आरबाज पटेल (७७७६०६१८३३)

• **मुखपृष्ठ**
रोहित घोगरे/पुणे

• **स्वागतमूल्य : ₹ २०/-**

• **पृष्ठ संख्या : ४०**

**वार्षिक वर्गणी**
४०० रू. (व्यक्तीसाठी) ५०० रू. (संस्थेसाठी)
**वर्गणी/देणगी पाठविण्याची सुविधा :**

**विवेक जागर संस्था**
ICICI **बँक, धुळे**
**खाते नंबर :** 646301002757
IFSC Code : ICIC0006463
Scan & Pay

आम्ही वारस विवेकाचे

विज्ञान निर्भयता नीती
विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण
**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र**

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

**R.N.I.No. MAHMAR/2022/83669**
**वर्ष चौथे । अंक आठवा । ऑगस्ट २०२५**

## अनुक्रमणिका

**संपादकीय** ४

**कार्याध्यक्ष संवाद**

• हिंसा के खिलाफ, मानवता की ओर... / संजय बनसोडे ५

**अभिवादन**

• कार्यकर्त्याचं भावविश्व समजून घेणारा नेता / उत्तम कांबळे ७

• एक फोन कॉल... ....डॉ. दाभोलकरांना/ प्रा. परेश शाह ९

• हे तुम्ही करावं... ते तुम्हीच करावं.../ दिगंबर कट्यारे १५

• ...या घोषणेला अर्थ आहे! / विनायक सावळे १७

**प्रासंगिक**

• जागतिक आदिवासी दिन :
पार्श्वभूमी, सद्यस्थिती व भविष्यातील आव्हाने / डॉ. राहुल पाटील २०

• भाषाशिक्षण : समज, गैरसमज / संजय सोनवणी २३

• राष्ट्र आणि राष्ट्रवाद / सलीम मोमीन २७

**अहवाल**

• जोविनि : विवेकी समाजाच्या दिशेने एक पाऊल / रेश्मा खाडे २९

**वेध बातमीचा**

• भोंदूबाबाने केले डिजिटल माध्यमातून 'हायटेक' शोषण/ उत्तम जोगदंड ३२

**खबरबात**

• महा. अंनिसची खबरबात ३६

'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhshradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

## शेवटच्या घटकापर्यंत स्वातंत्र्य पोहोचवू या!

१५ ऑगस्ट, १९४७ ला आपला भारत देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर आपल्या व्यक्तिगत, सामाजिक जीवनात काय फरक पडणार आहे. याची ७८ वर्षांपूर्वी सामान्य भारतीयाला फारशी कल्पना नसावी. परंतु ज्यांनी या स्वातंत्र्यासाठी जीवाचे रान केले, तुरुंगवास भोगला त्यांना, नवीनच उदयास आलेल्या देशाच्या धुरिणांना मात्र ही वाटचाल कशी करावयाची आहे याची चांगली जाणीव होती. या देशाची, समाजाची तसेच व्यक्तीची व्यक्तिगत जीवनातील वाटचाल कशी झाली म्हणजे स्वातंत्र्याची फळे सर्वांपर्यंत पोहोचतील अशी जाणकारांची स्वप्ने होती. देशाच्या या वाटचालीसाठीची त्या सर्वांनी अनेक चर्चा, संवाद, विचारमंथन करून सर्वसमावेशक असे भारताचे संविधान लिहिले.

हे स्वातंत्र्य तीन स्तरांवर पोहोचायला हवे-राजकीय, सामाजिक आणि आर्थिक. तिन्ही स्तरावरील स्वातंत्र्य परस्परावलंबी आहेत. त्यातही राजकीय स्वातंत्र्य राज्यकारभाराशी संबंधित असल्यामुळे त्याचा प्रभाव सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्यावर पडतो. त्यावेळी महात्मा गांधी म्हणाले होते की, सेवाभावी सामाजिक संस्थांनी हे स्वातंत्र्य सामान्य माणसापर्यंत पोहोचावे. स्वतः महात्मा गांधींनी देखील आपल्या हयातीत आश्रमांच्या स्वरुपात अशा संस्था स्थापन केल्या. काँग्रेस सेवा दल, राष्ट्र सेवा दल, सत्यशोधक समाज अशा काही सेवाभावी संस्था स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच सामाजिक कार्य करीत होत्या. मात्र स्वातंत्र्यानंतर आता विविध वंचित समूहांसाठी, सामाजिक परिवर्तनासाठी अशा अशासकीय समाजसेवी संस्थांची मोठ्या प्रमाणावर गरज होती. नव्या काळातील नव्या सामाजिक समस्या सोडविण्यासाठी चळवळींची गरज होती. अशाच काही नव्या सामाजिक गरजांसाठी, काही सामाजिक समस्यांची चिकित्सा करण्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी ९ ऑगस्ट, १९८९ ला 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती'ची स्थापना केली.

भोंदूगिरी, बुवाबाजी यापासून समाजाची फसवणूक थांबविणे आणि समाजातील अंधश्रद्धांच्या निर्मूलनासाठी संविधानाच्या कलम ५१क (ज) नुसार वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रचार व प्रसार करावा एवढीच महा. अंनिसची प्राथमिक उद्दिष्टे होती. तरीही डॉ. दाभोलकर व्यापक समाज परिवर्तनाच्या संकल्पना मांडत राहिले. आणि याच उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी व्यापक सामाजिक परिवर्तनाची निकड लक्षात घेऊन विविध क्षेत्रात काम करण्यासाठी संघटनेच्या कार्याचा विस्तार झाला. आजमितीस बुवाबाजीविरोधी संघर्ष विभागापासून जातिअंत संकल्प विभाग, संविधान जागर विभागापर्यंत संघटनेचे कार्य वेगवेगळ्या २३ विभागांमार्फत सुरु आहे.

संघटनेच्या या ३६ वर्षांच्या प्रवासात डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा झालेला खून ही गोष्ट आम्हा कार्यकर्त्यांसाठीच नाही तर संपूर्ण समाजासाठी अत्यंत वेदनादायी राहिलेली आहे. आज व्यापक समाज परिवर्तनाच्या क्षेत्रात 'डॉ. दाभोलकर' हा एक विचार झाला आहे. त्यामुळे तो विचार सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रातील सर्वच संघटनांनी स्वीकारला आहे. 'डॉ. दाभोलकर' हा एक विचार जपण्यासाठी, पुढे नेण्यासाठी नाशिकमध्ये पंचेचाळीसहून अधिक पुरोगामी संघटना गेली ११ वर्षे 'डॉ. नरेंद्र दाभोलकर विवेक व्याख्यानमाला' चालवीत आहेत.

महा. अंनिस करीत असलेल्या व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या कार्यातून स्वातंत्र्य आणि संविधानिक मूल्ये शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे कार्य करीत आहे. सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व संघटना 'डाव्या' समजल्या जातात. आणि अशा 'डाव्या' संघटना अलीकडेच महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या 'जनसुरक्षा' विधेयकाद्वारे लक्ष्य केल्या जाणार आहेत. निवडक संघटनांवरच अशा कारवाया करता याव्यात यासाठी 'कडव्या' हे एक विशेषण त्यात समाविष्ट करण्यात आले आहे. या कायद्यातील सर्वच बाबींवर कायदेतज्ज्ञांनी तपशिलात चर्चा केलेली आहे. परंतु 'डावे' हे विशेषण सापेक्ष आहे. समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता ही मूल्ये संविधानाच्या उद्देशिकेतून काढून टाकण्यासाठीच्या याचिकेवर नोव्हेंबर २०२४ मध्ये निर्णय देतांना सर्वोच्च न्यायालयाने एक निरीक्षण नोंदविले आहे की, 'राज्यघटना किंवा उद्देशिका कोणत्याही विशिष्ट, डाव्या किंवा उजव्या, आर्थिक धोरण किंवा रचनेचा पुरस्कार करीत नाही'. तेव्हा या देशाचे संविधान डावी किंवा उजवी विचारसरणी असे विभाजन न करता केवळ लोककल्याणकारी राज्याचा मात्र पुरस्कार करते हे लक्षात घ्यावे लागेल.

डॉ. नरेद्र दाभोलकर यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन! स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना हार्दिक सदिच्छा!

अतिथी संपादक

**प्रल्हाद मिस्त्री**

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

# हिंसा के खिलाफ, मानवता की ओर...



**संजय बनसोडे ।** इस्लामपूर (सांगली)
मो.९८५०८९९७१३

शहादा येथील विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीतून प्रेरणा घेऊन जिल्हा व राज्य पदाधिकाऱ्यांनी संघटनात्मक काम जोमाने सुरू केलेले दिसते. महा. अंनिसचे एकूण २३ विभागांमार्फत काम सुरू आहे. यातील सर्वेक्षण व संशोधन विभाग, संविधान जागर विभाग, व्यसन : प्रबोधन आणि संघर्ष विभाग तसेच समविचारी संस्था -संघटना संपर्क समन्वय विभाग हे चार विभाग नव्याने सुरू केले आहेत. कार्यकारी समितीच्या पुढाकाराने राज्य पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागांच्या कामांचे ध्येयविधान आणि तीन वर्षांचा भविष्यवेध करण्याचे आवाहन केले होते. त्यास सर्वच विभागांच्या कार्यवाह आणि सहकार्यवाह यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आपला विभाग अधिक क्रियाशील, लोकाभिमुख कसा होईल याबाबत विभागांचे कार्यवाह यांनी अधिक चांगले नियोजन केलेले आहे. राज्याचे प्रधान सचिव, सरचिटणीस या विभागांना मार्गदर्शन व सहकार्य करणार आहेत.

राज्य कार्यकारिणी बैठकीनंतर लगेचच जिल्ह्याच्या बैठका करण्याचा आपला नियम आहे. आजपर्यंत एकूण ३१ जिल्ह्याच्या या बैठका झाल्या असून इतर जिल्ह्यांच्या बैठका लवकरच घेण्याचे नियोजन आहे.

जोडीदाराची विवेकी निवड (जोविनि) या विभागांतर्गत सोलापूर येथे प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TOT) झाले. रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर या संस्थेने प्रशिक्षणाचे नियोजन केले होते. व्ही. व्ही. पी. इंजिनिअरिंग कॉलेजचे मोठे सहकार्य मिळाले. रोटरीच्या सहकार्याने सोलापूर व शेजारच्या जिल्ह्यांमध्ये जोविनिच्या किमान ५० कार्यशाळा होतील असं नियोजन करण्यात येणार आहे.

ऑगस्ट महिना हा संघटनेसाठी, आम्हा कार्यकर्त्यांसाठी संमिश्र भावनांचा अत्यंत महत्त्वाचा आहे. ९ ऑगस्ट, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा स्थापना दिवस. या वर्षी संघटनेला ३६ वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या वर्षी आळंदी येथे संघटनेची ३५ वर्षपूर्ती मोठ्या उत्साहात साजरी झाली. या वर्षीही संघटनेचा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे नियोजन आहे. त्यानिमित्ताने कार्यकर्ता कुटुंब मेळावा, व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम, चर्चासत्र तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे. संघटनेची ३६ वर्षांची दमदार वाटचाल ही महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्याही सामाजिक इतिहासामध्ये नोंद घेण्याची गोष्ट आहे. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींमध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मोठे योगदान निश्चितच नोंदवले जाणार आहे. अशा या लोकाभिमुख चळवळीचे आम्ही क्रियाशील घटक बनलो आहोत याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. पुढेही ही चळवळ अधिक सक्षम, व्यापक होण्यासाठी आमचे अथक प्रयत्न असेच चालू राहतील. आमच्या चळवळीचे सरासरी वय तरुण राहील याकडे आमचा कटाक्ष आहे.

मागील महिन्यातील महा. अंनिसमधील काही महत्त्वाच्या घडामोडी येथे नमूद करणे उचित ठरेल. जळगाव जिल्ह्यातील जामनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका महिलेवर आणि तिच्या गतिमंद मुलीवर अघोरी उपचार करणाऱ्या भोंदूबुवाचा पर्दाफाश करण्यात आला. नाशिक जिल्ह्यात येवला पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका भोंदूने एका महिलेस डाकीण, भुताळीण जाहीर करून तिचा छळ चालविला होता. या दोन्ही ठिकाणी अंनिस कार्यकर्त्यांच्या पुढाकारानेच जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल झालेले आहेत. परळी येथे भर रस्त्यात कोंबडे कापून अंधश्रद्धेचा, करणीचा प्रकार करणाऱ्या एका माजी नगराध्यक्षावर जादूटोणाविरुद्ध कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यासाठी कार्यकर्त्यांनी आग्रह धरला, तेव्हा कोठे पोलिसांनी तसा गुन्हा दाखल केला. जुलै महिन्यात कोपरगाव, पुणे आणि यवतमाळ या ठिकाणीही अशाच स्वरूपाचे गुन्हे जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत दाखल झालेले आहेत. बिहारमधील पूर्णिया जिल्ह्यातही चेटकीण असल्याचा संशय घेऊन एकाच कुटुंबातील पाच जणांना जाळून मारण्याचा अघोरी

अंधश्रद्धेचा प्रकार घडलाय. या घटनांच्या नोंदी समाजापुढे यासाठी ठेवायच्या आहेत की, संपूर्ण देशभर अशा अंधश्रद्धांतून घडणाऱ्या हिंसा आणि अन्याय अत्याचार, बुवाबाजी करून समाजाचे शोषण करणारे भोंदू, मांत्रिक आढळतात; त्यांना आळा घालण्यासाठी आता राष्ट्रीय स्तरावर जादूटोणाविरोधी कायदा करण्याची गरज अधोरेखित होते आहे. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीची किती निकड आहे हे काही प्रकरणांवरून आपल्या लक्षात येते आहे. समाजाला अंधश्रद्धांपासून, या भोंदू बुवाबाबांच्या शोषणापासून मुक्त करण्याचे संघटना म्हणून जेवढे जेवढे काही प्रयत्न करायचे आहेत तेवढे करण्याचा आमचा निर्धार आहे.

आमदार मनिषा कायंदे यांनी अधिवेशन चालू असताना विधानपरिषदेमध्ये या वर्षी पंढरीच्या वारीत अर्बन नक्षली शिरले आहेत असा आरोप केला. खरेतर हा आरोप संतांचे विचार पायदळी तुडवणारा असल्याचे मत संघटनेने नोंदवून त्यांच्या विधानाचा राज्यभर निषेध केलेला आहे. त्यांनी जे आरोप केले त्याचे पुरावे द्यावेत अशी मागणी महाराष्ट्र अंनिसने केलेली आहे. संविधान दिंडी, पर्यावरण दिंडी, एक दिवस तरी वारी अनुभवावी, हे उपक्रम संविधानिक मूल्ये, संतविचार पुढे घेऊन जाणारे आहेत अशी समितीची ठाम भूमिका आहे. त्याचप्रमाणे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावरील हल्ल्याचा संघटनेने निषेध नोंदवत हल्ल्याचे सूत्रधार शोधून संबंधितांवर कडक कारवाई करण्याची मागणी केलेली आहे.

संघटनास्तरावर विविध विभागांचे उपक्रम सतत चालू आहेत, शाखास्तरावर कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर होत आहेत. विविध विषयांवरील ऑनलाइन सेमिनार आणि व्याख्यानेही गेल्या महिन्यात झालेली आहेत. त्यात क्रियाशील कार्यकर्त्यांबरोबरच हितचिंतक, पाठीराखे आणि सामान्यजन सहभागी होत असतात ही खूप आश्वासक बाब आहे. जनसामान्यांच्या पाठिंब्यावर चाललेली ही जनचळवळ दिवसेंदिवस अधिक गतिमान करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

२० ऑगस्ट, शहीद डॉ नरेंद्र दाभोलकर यांचा बलिदान दिन. आम्हा कार्यकर्त्यांसाठी आयुष्यातला अत्यंत वेदनादायी दिवस. मात्र याच दिवशी या वेदना व्यक्त करण्यासाठी आम्ही संघटनेचा विवेकाचा, वैज्ञानिक दृष्टीकोनाचा, मानवतेचा विचार समाजात अधिक प्रखरपणे रुजविण्याचा निर्धार करीत असतो. या दिवसाच्या निमित्ताने 'हिंसा के खिलाफ, मानवता की ओर' हे मूल्य समाजात मांडण्याचे काम सुरूच आहे. ऑल इंडिया पीपल्स सायन्स नेटवर्क (AIPSN) आणि महा. अंनिस हे संयुक्तपणे २० ऑगस्ट हा राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टीकोन दिन म्हणून पाळतात .

मी कार्याध्यक्ष म्हणून महिन्याच्या पहिल्या बुधवारी सर्व जिल्हा कार्याध्यक्ष व जिल्हा प्रधान सचिव यांच्याशी ऑनलाईन संवाद करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. म्हणून सर्व जिल्हा कार्याध्यक्ष व जिल्हा प्रधान सचिव यांनी या ऑनलाईन संवादात सक्रिय सहभागी व्हावे, असे मी आवाहन करतो.

संघटनेचे मुखपत्र असलेल्या 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या मासिकाला सुरू होऊन चार वर्षे पूर्ण झाली आहेत. गुणात्मक आणि संख्यात्मकदृष्ट्या मासिक सक्षमपणे चालू आहे. मासिकाचा वाचकवर्ग वाढविण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नशील असावे.

एकमेकांच्या हातात हात घालून अत्यंत प्रेमाने, जिव्हाळ्याने विवेकाचा आवाज बुलंद करण्यासाठी कटिबद्ध राहू या!

●

**चमत्कार करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला २१ लाख रुपयांचे आव्हान समितीने दिले आहे.**
**चमत्काराचा दावा करणाऱ्या व्यक्तींना समितीची**
**आव्हान प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.**
**संपर्क : ९४०४८७०४३५**

# कार्यकर्त्यांचं भावविश्व समजून घेणारा नेता



**उत्तम कांबळे** । नाशिक
मो. ९८८१०९९१४३

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या विज्ञाननिष्ठ, विवेकवादी, परिवर्तनवादी असा लौकिक पावलेल्या संघटनेचे संस्थापक, संघटक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा सहवास मला अनेक वर्षे लाभला. चळवळीत प्रारंभापासून तर अखेरपर्यंत आम्ही परस्परांचे मित्र, हितचिंतक आणि सहकारी होतो. स्वाभाविकच एका मोठ्या कालखंडातील त्यांच्याविषयीच्या आठवणींचा माझ्या जीवनात एक मोठा साठा आहे. त्यातल्या काही आठवणी मला खूप भावतात. दाभोलकरांमधला एक सच्चा माणूस, एक सच्चा मित्र, एक सच्चा सामाजिक कार्यकर्ता, एक मदतगार याचं दर्शन अशा आठवणींमधून होतं.

मला आठवतं की, ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे हे एकदा अतिशय गंभीर आजाराने आजारी होते. त्या अगोदर त्यांची मुंबईत बायपास सर्जरीही झालेली होती. त्यानंतर हा आजार उद्भवलेला होता. नारायण सुर्वेंच्या इतका गरीब, आर्थिकदृष्ट्या दुर्बल असा साहित्यिक, लेखक, कवी दुसरा कोणी नसेल. आम्ही त्यांना उपचार घेण्यासाठी तयार केलं. त्याविषयी हालचाली सुरु केल्या आणि लक्षात आले की, उपचारांसाठीचा खर्चाचा आकडा खूप मोठा आहे. आणि सुर्व्यांच्याकडे तर काही पैसे नव्हते. मग आम्ही काही सुर्व्यांचे चाहते, हितचिंतक यांनी निधी जमवायला सुरुवात केली. सुर्व्यांसारखा एक महाकवी आजारी पडला आणि त्यांच्या उपचारासाठी मदत करणारे हात जेवढे पाहिजेत तेवढे पुढे येत नव्हते; ही पण एक वाईट गोष्ट. मी तर खूप अस्वस्थ झालो. कुणाकडे मदत मागावी? ती मिळेल का? या विवंचनेत असताना मला डॉक्टर दाभोलकरांचे नाव आठवले. मी त्यांना फोन केला नि सर्व परिस्थिती सांगितली. ऐकल्यानंतर ते म्हणाले, अरे, उपचार तर करायलाच पाहिजेत. सुर्वे सगळ्या समाजाचा, देशाचा, माणसांचा क्रांतिकारी कवी! सुर्वे जगले पाहिजेत.

आतापर्यंत निधीसाठी काय प्रयत्न केले ते मी दाभोलकरांशी बोललो. काही ठिकाणं अशी होती की, तिथून मदत घेतलेली सुर्वेंना आवडणारं नव्हतं. दाभोलकर म्हणाले, काही काळजी करू नकोस. मी पण शक्य तेवढी मदत देतो. डॉ. श्रीराम लागूंशी, निळूभाऊंशी, इतर मित्र आहेत या सगळ्यांशी बोलतो. मला थोडा वेळ दे.

काही दिवसांनी त्यांनी सांगितलं, मी एवढी अशी मदत जमवली आहे. ती तुम्ही घेऊन जा, नाही तर मी आणून देतो. एक कवी, त्याची कविता, कवितेचे मूल्य, त्याचे माणूस म्हणून समाजासाठीचे मोल काय असते ते स्वतः एक संघटक, कार्यकर्ता असलेले दाभोलकर जाणत होते. त्यांनी अतिशय धावपळ करून निधी जमवला होता. पण तेवढी रक्कमही पुरेशी नव्हती.

त्या काळामध्ये मग भाई वैद्य मदतीला धावून आले. त्यांच्याशी मी बोललो. भाई वैद्य सरळ मुंबईला जाऊन मुख्यमंत्र्यांना भेटले. मुख्यमंत्र्यांनी शासनामार्फत काही निधी देऊ केला आणि नारायण सुर्वेंवर उपचार झाले. ते ठणठणीत बरे झाले. पुढे अनेक वर्ष ते चांगले जगले; त्यांचा सहवास लाभला. आपण एका महाकवीला वाचवू शकलो, त्यात दाभोलकरांची सुद्धा झालेली मोठी मदत मला सातत्याने आठवत राहते.

दाभोलकर हे पेशाने डॉक्टर होते. केवळ सुर्वेंच्याच तब्येतीची त्यांनी काळजी घेतली असे नाही. ते आपल्या कार्यकर्त्यांच्या तब्येतीची सुद्धा काळजी घ्यायचे. कोणत्या कार्यकर्त्याला बीपी, डायबिटीस, हार्ट प्रॉब्लेम आहे, याची त्यांना माहिती असायची. मला सुद्धा खूप वर्षांपासून डायबिटीस आहे हे त्यांना माहीत होतं. प्रत्येक भेटीत ते माझ्या शुगरची आस्थेने चौकशी करायचे. शुगर लेव्हल काय असते, ती वाढते का, कशामुळे वाढते, तू औषधं कोणती घेतोस, तू व्यायाम करतोस का, रोज चालतोस का, पथ्यपाणी पाळतोस का, असा प्रत्यक्ष भेटीत किंवा फोनवर सुद्धा माझा एक धडाच जणू ते घ्यायचे. त्यांच्याकडे काही उपचाराच्या गोष्टी असायच्या. कुटुंबातला माणूस जेवढी काळजी घेणार नाही तेवढी आपली काळजी ते घ्यायचे. कार्यकर्त्यांच्या कुटुंबाविषयी, आरोग्याविषयी, शिक्षणाविषयी एखाद्या जवळच्या नातेवाईकासारखी ते विचारपूस करीत. त्यामुळे त्यांच्याविषयी कार्यकर्त्यांच्या मनामध्ये सुद्धा अशी भावना तयार व्हायची की, हा आपला केवळ नेता नाहीये, तो कधी

आपला वडील होतो, कधी मित्र तर कधी हितचिंतक होतो. अशा सगळ्या नात्यांची भूमिका ते निभावत होते. म्हणून त्यांच्यासोबत एक घट्ट वैचारिक नातं तयार होऊन कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर जोडले गेले.

अनेकदा त्यांच्याशी मला प्रवास करण्याची संधी मिळाली. दोघं एका गाडीतून फिरलो आणि लांबचा प्रवास केला. मला आश्चर्य वाटायचं की, माझ्या जेवणाची वेळ झाली आहे हे त्यांना पटकन कळायचं. अरे, तुला डायबिटीस आहे, वेळेत जेवून घे. इतकी आस्थेवाईक काळजी केल्यामुळे मला बरं पण वाटायचं. मला वाटायचं की, मी पत्रकार आहे, लेखक आहे, माझी जास्त काळजी घेत असतील. पण ते तसंही नव्हतं. ते त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाची अशी काळजी घेत असत. मी कार्यकर्त्यांशी बोलतांना असे अनेक कार्यकर्ते भेटायचे की, डॉक्टर दाभोलकर त्यांची सुद्धा याच पद्धतीने काळजी घ्यायचे. यातूनच या कार्यकर्त्यांची जडणघडण होत होती. कार्यकर्ता कधीही नुसतं काम सांगून तयार होत नसतो. कार्यकर्त्याचं भावविश्वसुद्धा समजून घेणारा नेता हवा असतो. आणि दाभोलकर हे असे नेते होते की, कार्यकर्त्याच्या मनात खोलवर त्यांच्याविषयी आपोआप जागा निर्माण व्हायची. कार्यकर्त्याच्या मनातील विषय ओळखून त्यावर ते चर्चा करायचे. कार्यकर्त्याशी बोलतांना त्यांच्या आवडीचा विषय असायचा, तू हे वाचलेस का? तू ते ऐकलेस का? तू हा विचार ऐकलाय का? तुझं वाचन वाढव. तू हे पुस्तक पाहिले का? सातत्याने ते अशी माहिती कार्यकर्त्यांना देत. विशेषत: मला तरी त्यांनी अशी अनेक पुस्तके वाचायला लावलेली आहेत, जी माझ्या संग्रही नव्हती आणि वाचनात आलेली नव्हती. आपल्यामध्ये असा एक विश्वास निर्माण व्हायचा की, दाभोलकर आपल्याबरोबर असल्यामुळे आपल्याला कोणतीही गोष्ट सुलभपणे करता येईल.

मी त्यांना एकदा अशी कल्पना दिली होती की, महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यांमध्ये वेगवेगळ्या तिथीच्या, धार्मिक समारंभाच्या, सण उत्सवाच्या कोणकोणत्या अंधश्रद्धा असतात त्यांचा एक संग्रह आपण तयार करू या. मग एकेका अंधश्रद्धेला आपल्याला हात घालता येईल. मी म्हटलं, 'माझ्या सर्व बातमीदारांना प्रत्येक गावातल्या प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा यांचे संकलन करायला सांगतो. माझ्या दैनिकात त्यांची मालिका सुरु करू. त्याचं पुस्तक छापायचं की नाही ते नंतर बघू. त्यांना ती कल्पना खूप आवडली नि मला म्हटले, 'अरे, तू तर आमचंच काम करायला लागलास'. आणि मी वर्ष, दीड वर्ष ही मालिका आमच्या दैनिकात चालवली. ही मालिका संपत आली तेव्हा दाभोलकरांचा फोन आला, 'अरे, त्याचं पुस्तक काढायचं'. मी म्हटलं, 'या विषयाचं पुस्तक कोण काढणार, दाभोलकर? त्याला प्रकाशक कोठून मिळणार?' ते म्हणाले, 'नाही का मिळेना, मी तुला सगळा निधी उपलब्ध करून देतो.' एक दानशूर व्यक्ती माझ्याकडे आहेत. तू पुस्तकाच्या तयारीला लाग.' मला इतका आनंद झाला की, ते सर्व मी एकत्र केलं, संपादित केलं, त्याला प्रस्तावना लिहिली आणि मी ते पुरोगामी चळवळींचे प्रकाशक विलास वाघ यांच्याकडे घेऊन गेलो. त्यांना दाभोलकरांनी फोन केला, 'तुमचा छापण्याचा सर्व खर्च आम्ही देऊ'. आणि मला वाटतं माझ्या आयुष्यातलं पहिलं पुस्तक अशा पद्धतीने निघालं. 'प्रथा अशी न्यारी' या शीर्षकाचं ते पुस्तक गाजलं सुद्धा! त्याला पुरस्कारही मिळाला. या सगळ्या गोष्टी मी आयुष्यभर मनात जपून ठेवलेल्या आहेत. कारण प्रत्येक गोष्टीचा त्या त्या व्यक्तीच्या जीवनामध्ये एक टर्निंग पॉईंटसारखा संदर्भ असतो. टर्निंग पॉईंटनंतर तो माणूस नव्या उमेदीने काम करतो, नव्या कल्पनेने काम करतो. कारण त्यावेळी त्याच्या पाठीशी कोणीतरी उभे राहिलेले असते. हे पाठबळ देणारा माणूस नेत्याच्या स्वरूपात कधी आपल्याला दिसत नाही. कारण त्याचे रूपांतर कधीच कार्यकर्त्यामध्ये, कुटुंबातल्या सदस्यामध्ये, मित्रामध्ये, हितचिंतकामध्ये आणि मार्गदर्शकामध्ये झालेलं असतं. अशा वेगवेगळ्या भूमिका एकाच वेळेला करताना मी दाभोलकरांना अनेक वेळा पाहिलेलं आहे, अनुभवलेलं आहे. त्यांच्या अशा व्यक्तिमत्त्वाचा एक मोठी चळवळ उभी राहण्यासाठी, ती टिकवण्यासाठी, यशस्वी होण्यासाठी खूप उपयोग झालेला आहे.

मी नेहमीच सांगत आलेलो आहे, असे नेते, अशा संघटना आता आपल्याला अपवादानेच पाहायला मिळतात. जे काही आहेत ते टिकवून ठेवायला पाहिजेत एवढंच मला वाटतं. मी दाभोलकरांच्या स्मृतींना मनापासून अभिवादन करतो, त्यांना आदरांजली वाहतो. त्यांनी दिलेल्या गोष्टी, त्यांच्याविषयीच्या आठवणी मी अशाच जपून ठेवणार आहे.

**(लेखक ज्येष्ठ साहित्यिक, संपादक, विचारवंत असून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य उपाध्यक्ष आहेत.)**

**शब्दांकन : प्रा. संदीप गिरासे**

●



# एक फोन कॉल... ....डॉ. दाभोलकरांना

**प्रा. परेश शाह ।** शिंदखेडा
मो.९४२१४६५८६४

''हॅलो डॉक्टर!''

''अरेच्च्या! नुसत्या आवाजावरून ओळखलंत, डॉक्टर? ग्रेट!!''

''कसे आहात? खूप आठवण येत होती. म्हटलं, पत्र लिहिण्यापेक्षा फोनच करू या.''

''हो, खरंय. विनायक लिहीत असतो तुम्हाला नियमित पत्र.''

''डॉक्टर, मी हॅलो म्हणायचा अवकाश आणि तुमचा समोरून 'बोल, परेश' प्रतिसाद ऐकून अक्षरशः मोहोरल्यासारखं झालंय. तुम्ही 'महाराष्ट्र फाउंडेशन'चा पुरस्कार घ्यायला अमेरिकेत गेला होतात आणि तिथून एक दिवस अचानक तुमचा फोन आला. त्यावेळी जेवढा आनंद झाला होता ना, अगदी तस्साच फील या क्षणाला आहे.''

''डॉक्टर, सर्वप्रथम महाराष्ट्र अंनिसच्या वर्धापनदिनानिमित्त तुम्हाला खूप खूप सदिच्छा! महाराष्ट्र अंनिसच्या स्थापनेला छत्तीस वर्षं म्हणजे तीन तप पूर्ण झालीत, डॉक्टर!''

''हो, हो... थँक्यू, डॉक्टर!''

''डॉक्टर, मला अजून आठवतात, त्या पुण्याच्या आपटे प्रशालेतील, अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकरांच्या लोणावळा येथील अर्थविज्ञान वर्धिनीमधील आणि शांतिवन, नेरे-पनवेलमधील बैठका. मी तेव्हा कॉलेजला शिकायचो, १९८७-८८ मधील गोष्ट आहे ती. १९८६च्या चोपडा येथील शिबिरात सर्वप्रथम तुम्हाला ऐकले होते.''

''होय बरोबर, डॉक्टर. तुमचे अतिशय संयमी वागणे तेव्हाही भावले होते. 'आपण एक वर्ष शांत राहून आपापल्या ठिकाणी काम करीत राहू, त्यानंतर ठरवू', असे तुम्ही सर्वांना शांत करताना म्हणाला होतात. त्यानंतर बरोबर एक वर्षाने ९ ऑगस्ट, १९८९ रोजी 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' या नावाने स्वतंत्र काम करण्याचा निर्णय घेण्यात आला.''

''डॉक्टर, तुम्हाला सांगू? त्यावेळची काही पत्रं, फार नाही पण ३-४ असतील, अजून सांभाळून ठेवली आहेत मी.''

''हो, म्हणजे दोन्ही बाजूंची आहेत.''

''अगदी बरोबर, डॉक्टर. आणि त्यावेळी देखील मतभेदाचा प्रमुख मुद्दा लोकशाही कार्यपद्धतीचाच होता. म्हणजे अगदी पहिल्या दिवसापासून आपण लोकशाही मार्गानेच मार्गक्रमण करीत आहोत. ही शिस्त आपणच घालून दिलेली आहे, डॉक्टर.''

''डॉक्टर, वेळ आहे ना? खूप खूप बोलायचं आहे. तशी तुमची आठवण तर कायमच येत असते. प्रत्येक काम करताना तुमचीच प्रेरणा असते. नैराश्य आले तरी तुमची आठवण करीत असतो. आता डॉक्टर असते, तर काय केले असते? काय भूमिका घेतली असती? माध्यमांमध्ये काय बोलले असते? कोणता कृतिकार्यक्रम ठरवला असता? कसा लेख लिहिला असता? असा विचार करतो आणि आम्हाला बळ मिळते. मग आपोआप कृतिशील होतो.''

''काय? कसले नैराश्य येते?''

''डॉक्टर, सभोवतालची राजकीय - सामाजिक परिस्थिती कधी नव्हे एवढी भयंकर आहे. अस्वस्थ करणारी आहे. या विद्वेषी वातावरणात महाराष्ट्रातील अनेक पुरोगामी संस्था - संघटना खचल्यासारख्या दिसताहेत. निराशेच्या गर्तेत गेल्या आहेत. सामाजिक - सांस्कृतिक क्षेत्रात भयाण शांतता आहे. हताश, हतबलता आल्यासारखी स्थिती आहे. जे काही थोड्या लोकांचं बरं चाललंय त्यात आपण एक प्रमुख आहोत. आपले कार्यकर्ते मात्र सतत उपक्रमशील आहेत. महाराष्ट्रभर दररोज काही ना काही ॲक्टिव्हिटी सुरूच असतात.''

''चैतन्याची सळसळ? हो, म्हणजे आपल्या कामाची उपयोगिता आपण सिद्ध केली आहे आणि अंधश्रद्धा निर्मूलनाच्या आपल्या क्षेत्रात तर दररोज काही ना काही घडतच असते. नवीन प्रश्न.... नवीन आव्हाने....''

''पण कार्यकर्ते मनापासून काम करतात. जबरदस्त

कमिटमेंट आहे आपल्या कार्यकर्त्यांची! कामात नावीन्यपूर्णता, सर्जनशीलताही असते. फक्त उणीव असते ती तुमचीच, डॉक्टर! म्हणजे तुम्ही फिजिकली सोबत नसतात एवढेच.''

''काळ किती भरभर जातो ना? तुम्हाला जाऊन देखील १२ वर्षं, एक तप लोटलंय. विचारांनी तर तुम्ही कायमच सोबत असता आम्हा सर्वांच्या. 'माणूस मारता येतो, विचार मरत नाही'; हे इतिहासात पुन्हा पुन्हा सिद्ध झाले आहे. 'तुम्ही' हा त्याचा नजीकचा पुरावा.''

''संघटनेचं काय काय चाललंय? कसं चाललंय? असं विचारताहेत ना, डॉक्टर? सांगतो, सगळं सांगतो. काय झालंय, इतक्या दिवसांनी तुमच्याशी बोलतोय ना, तर किती सांगू नि किती नको असं झालंय. त्यामुळे नेमकी कोठून सुरुवात करू? असा गोंधळ मनात आहे. चला सांगतो....''

''डॉक्टर, आपण शनिशिंगणापूरचं आंदोलन केलं होतं. बुवाबाजी संघर्षाच्या प्रकरणांपैकी जवळपास सर्वात मोठं असं हे प्रकरण. शनिशिंगणापूरचं स्थानमाहात्म्य असं सांगितलं जात होतं की, तेथे चोऱ्या होत नाहीत. कोणी चोरी केलीच तर शनिदेवाच्या इंग्यामुळे ती व्यक्ती भ्रमिष्टासारखी होऊन तेथेच फिरत राहाते. म्हणून तेथे घरांच्या दाराला कडी – कुलुपे नाहीत.

ही गोष्ट चमत्कृतीकडे, अंधश्रद्धेकडे नेणारी होती, म्हणून तिला आव्हान देणे हा एक भाग त्यात होता आणि दुसरा त्यापेक्षा अधिक महत्त्वाचा. तेथील शनिदेवाच्या चौथऱ्यावर महिलांना प्रवेश नाही ही गोष्ट संविधानातील समतेच्या मूल्याला छेद देणारी आणि महिलांचा संविधानिक अधिकार नाकारणारी होती. पण वर्तमानपत्रवाल्यांनी हेडलाईन केली, 'चला शनिशिंगणापूरला... चोरी करायला' असं वाक्य तुमच्या तोंडी टाकून.

सांगायचा गंभीर मुद्दा असा की, शनिशिंगणापूरला चोरी नाही, तर मोठ्ठा दरोडा टाकलाय! आणि तो दुसऱ्या – तिसऱ्या कोणी नाही, तर खुद्द मंदिराच्या विश्वस्तांनीच! महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन नुकतेच संपले. स्वतः मुख्यमंत्र्यांनी मंदिराचे विश्वस्त मंडळ बरखास्त केल्याचे निवेदन केले. प्रथमदर्शनी चौकशीत १०० कोटींचा घोटाळा झाला आहे. पण हा आकडा ५०० कोटींपर्यंत जाईल अशी माहितीही त्यांनीच दिली. याचा अर्थ, 'शनिशिंगणापूरला चोरी होत नाही' हे पसरवलेले सर्व कथानक खोटे आहे आणि शनिदेवाचा कोपबीप काहीही होत नाही, याची विश्वस्तांना पक्की खात्री होती, असेच म्हणावे लागेल.

महत्त्वाचे म्हणजे जे स्वतःला धर्मरक्षक, संस्कृतिरक्षक पक्ष – संघटना म्हणवतात आणि आपल्या आंदोलनाला त्या काळी ज्यांनी कडवा विरोध केला होता, त्याच पक्षाच्या लोकांनी आज या दरोड्याच्या (भ्रष्टाचाराच्या) तक्रारी केलेल्या आहेत. म्हणून मुख्यमंत्र्यांना ही कारवाई करावी लागली. पण तोपर्यंत समाजाची खूप मोठी फसवणूक झालेली असते.''

''हो, हो अगदी खरंय, डॉक्टर. आपण एखादा उपक्रम हाती घेतला किंवा एखाद्या इश्युवर काम सुरू केले तर काहीही विचार न करता, समजून न घेता बुद्धिपुरस्सर त्यास विरोधासाठी विरोध करायचा असे काही लोकांनी ठरविलेलेच असते जणू. पण पुढे जाऊन आपल्याला जनतेचा प्रतिसाद मिळायला लागला, मान्यता मिळू लागली की, ही मंडळी त्या कार्यक्रमाचे अपहरण करून तो स्वतःचाच म्हणून राबवायला लागतात. जसे, पर्यावरणपूरक गणेशोत्सव हा उपक्रम तर आता शासनानेच अंगीकारला आहे. त्यावेळचे आपले विरोधकही हाच उपक्रम धुमधडाक्यात करतात. जादूटोणाविरोधी कायद्यासाठीचा १८ वर्षांचा संघर्ष आणि तुमचे बलिदान हे याचे परमोच्च उदाहरण! तुमच्या निर्घृण खुनानंतर लगेचच शासनाने अध्यादेश काढून पुढे कायदा पारित केला.

राममनोहर लोहिया यांचे ते विधान आहे ना, डॉक्टर? 'लोग मेरी बातें मानेंगे जरूर, लेकिन मेरे मरने के बाद....''

''हो, बरोबर. अशा अनेक गोष्टी, उदाहरणे सांगता येतील, डॉक्टर.''

''एक सांगू, डॉक्टर. शनिशिंगणापूरचे आंदोलन मला वेगळ्या कारणासाठी कायम लक्षात राहील. महाराष्ट्र अंनिस शनिशिंगणापूरला आंदोलन करणार, शनिदेवाच्या चौथऱ्यावर महिला चढणार, या बातम्यांमुळे महाराष्ट्रभर खळबळ माजली होती. अहमदनगर (आताचे अहिल्यानगर) जिल्ह्यातील वातावरण प्रचंड तापले होते. कलेक्टर, डी.एस.पी. सगळ्या यंत्रणांवर ताण आला होता. तुमच्यासोबत प्रशासनाचे सतत बोलणे सुरू होते. दिवस मुक्रर होता. माध्यमांमध्ये चर्चा सुरू होती. आधीच्या रात्री नगर जिल्ह्याच्या सीमा सील केल्या

गेल्या होत्या. महाराष्ट्रभरातून कार्यकर्ते पोहोचले होते, पोहोचत होते. आदल्या दिवशी राष्ट्रसेवा दलातर्फे चाळीसगाव येथे 'युवा जाहीरनामा परिषद' होती. त्या सगळ्या प्रक्रियेत अविनाश, गोपाळ नेवे, विनायक, मी असे सगळे होतो. रात्री परिषद आटोपून आम्ही रेल्वेने निघलो होतो. महाराष्ट्र एक्सप्रेस रात्री दीड - दोनच्या सुमारास अहमदनगरला पोहोचली होती. परंतु दिवसभराच्या गडबडीत बातम्या बघितल्या नव्हत्या. त्यामुळे नगर जिल्ह्यातील तणावाची कल्पना नव्हती.

स्टेशनवर गाडी पोहोचली आणि आम्ही डब्यातून उतरलो. फलाटावर चालू लागलो तोच समोर तुम्ही, बाबा अरगडे येताना दिसलात. मागे पुढे पोलिसांचा गराडा. त्यात दोन दोन हत्यारबंद पोलीस, तर काही साध्या वेशातील. स्टेशनबाहेर आलो तर दोन पोलीस गाड्या, एक व्हॅन, डीवायएसपी दर्जाचे अधिकारी, असा लवाजमा नि त्यांच्यामध्ये आपली गाडी. गाडीत बसल्यावर तुम्ही आंदोलनाची सर्व पार्श्वभूमी सांगितली. खरंच सांगतो डॉक्टर, आता देखील हे आठवताना माझ्या डोळ्यांत पाणी आहे. एवढ्या प्रसंगात, दिवसभराचा इतका प्रचंड ताण असताना, विखारी वातावरण असताना आपल्या एकेका कार्यकर्त्याची एवढी काळजी घेणारा, त्यासाठी पूर्ण रात्र जागून काढणारा कोण नेता असू शकेल? आम्हा कार्यकर्त्यांची जी जडणघडण होत गेली ती अशा शेकडो घटना-प्रसंगांतून होत गेली. अशा प्रसंगातील 'तुम्ही' 'नेतृत्व' म्हणून आमची 'प्रेरणा' बनला नसतात तरच नवल!''

''नाही, डॉक्टर. मी इथला हालहवाल सांगण्यासाठीच फोन केलाय. यात कौतुकाचा मुद्दा नाही. तुम्हाला ते वागणे इतके सहज वाटते, पण या घटनेचे मोल खूप आहे. असा एकेक कार्यकर्ता जपणं, त्याची काळजी घेणं यातूनच नात्यांची वीण घट्ट होत जाते आणि संघटना मजबूत होत जाते. तुम्ही ते जीवापाड सांभाळलं. म्हणून तुमच्या जाण्यानंतर आणि फुटीनंतरही संघटना त्याच ताकदीने उभी आहे.''

''हो, हो. आणखी एक भारी गोष्ट सांगतो. मागील वर्षी संघटनेला ३५ वर्षे पूर्ण झाली आणि त्याचवेळी भारतीय संविधानाला ७५ वर्षे देखील पूर्ण झाली. त्याचे औचित्य साधून आपण आळंदीला एक दिवसीय 'संविधान सन्मान राष्ट्रीय परिषद' आणि दोन दिवसांचे संघटनेचे राज्य अधिवेशन आयोजित केले होते. अत्यंत दिमाखात पार पडले.''

''अगदी, अगदी बरोब्बर. आपण दशकपूर्ती व द्विदशकपूर्ती अधिवेशन पुण्यात घेतले होते ना? अगदी तस्संच! फक्त अधिवेशनाला जोडून आपण एक दिवसाची राष्ट्रीय परिषद घेतली. आपल्या पंचसूत्रीतील संविधान मूल्यांचा जागर हे चौथे महत्त्वाचे मूल्य आहे. त्या विषयावर देशभरात लहानमोठे कार्यक्रम झाले असतील पण राष्ट्रीय परिषद घेणारे आपण पहिलेच, कदाचित एकमेव आहोत.''

''तुम्हाला सांगू, डॉक्टर? याच प्रकारे पुण्याच्या त्याच शिवशंकर सभागृहात आपण रौप्यपूर्ती अधिवेशन आयोजित केले होते. कारण संघटनेच्या आयुष्यात २५ वर्षांचा टप्पा पार केला, ही मोठी बाब होती. फक्त एक वर्ष पुढे घेतले होते. ऑगस्ट २०१४ ला २५ वर्षे स्थापनेला पूर्ण होत होती. पण २०१३ ऑगस्टलाच तुमचा खून झाला. त्या धक्क्यातून जेमतेम सावरत होतो म्हणून.''

''पण डॉक्टर, त्याचवेळी आपण निर्धार केला की, दहाऐवजी दर पाच वर्षांच्या टप्प्यांनी अधिवेशन घ्यायचेच आणि पुढचे त्रिदशकपूर्ती अधिवेशन तर मुंबईत घ्यायचे. सोप्पी गोष्ट नव्हती. मुंबईसारख्या ठिकाणी अगदी एवढी मोठी जागा मिळण्यापासून अडचण होती. पण आपण अधिवेशनच नाही तर त्याला जोडून एक दिवसाची विवेकवादावरील आंतरराष्ट्रीय परिषददेखील यशस्वी केली तेव्हा 'अंधश्रद्धा निर्मूलनाचे संघटितपणे कार्य करणारी जगातील एवढी मोठी विवेकवादी संघटना महाराष्ट्र अंनिस हीच आहे', हे आलेल्या परदेशी पाहुण्यांनी अधोरेखित केले होते. पुढल्या वर्षी आपल्याला अमेरिकेत बोलवून पुरस्कार दिला होता. त्यावेळी विनायकने हे सर्व पत्रात कळविले असेलच. पण सहजच आठवण केली.''

''तर डॉक्टर, मुंबईसारख्या शहरात जागा मिळविण्यासारख्या अनेक अवघड गोष्टी आपल्या सुधीर निंबाळकरने पार पाडल्या.''

''हो, हो. जळगावचा. तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. तुम्ही त्याला छोटाच बघितला आहे. मात्र आता त्याची कीर्ती महान झाली आहे बरं का. जळगावात नियमित कामात यायचा तेव्हा विद्यार्थीच होता. मधली काही वर्षे शिक्षण - नोकरीच्या गडबडीत गेली. पण तुम्ही गेल्यापासून पुन्हा सक्रिय आहे. खूप रिसोर्सफूल आहे. तुम्हाला सांगू? वारसाहक्क आणि मालकीहक्कामुळे काही

मोजकी माणसे बाजूला झाली. त्यातच संघटनेची सगळीच संसाधने ट्रस्टकडे गेली. त्यात 'वार्तापत्र', आपले मासिक देखील. संघटनेने पुन्हा शून्यातून सर्व उभे केले. 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' नावाने स्वतंत्र मासिक सुरू केले. त्याचे आर. एन. आय. रजिस्ट्रेशन आणि टपाल खात्याचा सवलतीचा परवाना ही दोन्ही जिकिरीची कामे सुधीरने एकहाती पार पाडली.''

''आणि आणि.... डॉक्टर, एक भारी आनंदाची गोष्ट......! आपल्या संघटनेचे 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' हे नाव आणि 'विज्ञान, निर्भयता, नीती', हे आपले ब्रीद असलेला लोगो; त्याचा आपण ट्रेडमार्क मिळवून अधिकृत मालकी संघटनेकडे राखण्यात यश मिळविले आहे. खूप मोठी गोष्ट! डॉक्टर, तुम्हाला सांगतो, मुद्दा अधिकाराचा नव्हता. कुटुंबीय आणि ट्रस्टी कसेही वागोत, त्यांच्याशी भांडण्यात कोणालाही स्वारस्य नव्हते. पण इच्छा नसताना ही लढाई आत्मसन्मानाची झाली. कारण 'संघटनेचे नाव वापरले तर फौजदारी गुन्हा दाखल करू', अशा आशयाची नोटीस ट्रस्टच्या गटाने दिली होती.''

''नाही आवडले ना तुम्हाला?'' तुम्हालाच काय, त्यांचे असे वागणे त्रयस्थालाही आवडणार नाही. पण जाऊ द्या...''

''सॉरी हं, डॉक्टर. याबद्दल काही बोलायचं नाही, असं मी ठरवलं होतं. पण ओघातच आलं ते. कधीतरी वाटेल त्यांना, आपण एवढे अविवेकी कसे वागलो म्हणून. तर या ट्रेडमार्कच्या कामाचा पाठपुरावा देखील सुधीरच्याच पुढाकाराने सुरू होता. आताही सुरू आहे.''

''हो नक्कीच. त्याला एकदा तुम्हाला फोन करायला सांगतो, डॉक्टर. तुम्हीच त्याला शाबासकी द्या.''

''डॉक्टर, तुम्हाला वेळ तर नाही ना होत आहे? कारण माझं आपलं सुरूच आहे. खूप दिवसांचा बॅकलॉग आहे ना, डॉक्टर, बोलण्याचा. काय म्हणालात? भरपूर वेळ आहे. मनसोक्त बोलू. तुम्हाला ऐकायला बरं वाटतंय? ऐका तर मग....

अलीकडे पुरोगामी संस्था - संघटनांत जी काही तरुणाई दिसते, ती आपल्याकडेच आहे. ही तरुणाई तंत्रस्नेही आहे. कल्पक आहे, कामात नावीन्य आहे, सर्जनशीलता आहे. ३५ वर्षपूर्ती अधिवेशन आणि संविधानाची राष्ट्रीय परिषद या दोन्हींचे उद्घाटन कमालीचे अफलातून, नावीन्यपूर्ण झाले. त्याची व्हिडिओ क्लिप बघितलीच असेल. नसेल तर पाठवून देईन व्हॉट्स ॲपला. ती सर्व आयडिया पनवेल टीमची होती. आरती, महेंद्र, प्रियांका, सिद्धेश, सगळे म्हणजे एक से एक. डॉक्टर, याच टीमने संघटनेच्या ३५ वर्षांच्या वाटचालीची प्रदर्शनी बनवली आहे. ते प्रदर्शन देखील आळंदीला मांडले होते. जबरदस्त!

आणि हो डॉक्टर, आपल्या पालघरच्या अनिल करवीरने पस्तीस वर्षपूर्तीनिमित्त एक गीत तयार केले आहे. तुम्ही असताना आणि तुमच्या खुनाच्या वेदनेतून उत्स्फूर्तपणे जशी अनेक गाणी तयार झाली, त्यापेक्षाही सरस. निव्वळ अप्रतिम! अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी ते गीत मोठ्या स्क्रीनवर दाखवले. त्यात व्हिडिओ बनविताना कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चा वापर करून तुम्हाला दाखविले आहे. जणू काही तुम्ही समोर बोलतच आहात इतके हुबेहूब! सर्वांनी टाळ्यांचा प्रचंड गजर करत स्टँडिंग ओव्हेशन दिलेच. पण तुम्हाला बघून प्रत्येकाच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते. सर्वजण भारावून गेले होते. पुण्याच्या फाळके काका-काकूंनी तर ३५ वर्षपूर्ती गीत ऐकून उत्स्फूर्तपणे त्याचक्षणी संघटनेला पस्तीस हजारांची देणगी दिली.''

''या देणगीवरून आठवले, डॉक्टर. आपण काम करीत राहिलो की, त्याची दखल समाजात कशी घेतली जाते बघा. नाशिकमध्ये सीताराम कोल्हे नावाचे एक सद्गृहस्थ होते. एच.ए.एल. मधून निवृत्त झालेले. मार्च महिन्यात त्यांचे निधन झाले. मृत्यूपूर्वी पत्नी प्रतिभाताईंना सांगितले की, माझे मरणोत्तर देहदान करावे आणि महाराष्ट्र अंनिसला रुपये ७५ हजारांची देणगी द्यावी. त्यांचा भाचा आणि भाचेसून तपास करीत आपल्यापर्यंत पोहोचले. तेव्हा डॉ. ठकसेन गोराणे व प्रा. आशा लांडगे मॅडम वगैरेंनी घरी जाऊन रकमेचा धनादेश प्राप्त केला. कोणताही परिचय नसताना संघटनेच्या नुसत्या विचारांनी प्रभावित होऊन लोक मदत करतात. केवढी मोठी गोष्ट!''

''चला, डॉक्टर. खूप वेळ घेतला, राहिलेले पुन्हा कधीतरी बोलू.''

''काय म्हणालात? आणखी सांगू? ऐकत रहावेसे वाटतेय. काही पण काय? उगीच माझ्या समाधानासाठी....''

''नाही, मला काही काम नाही. आणि तुमच्याशी एवढं बोलायला मिळतंय यापेक्षा अधिक आनंददायी काय असणार? चला भराभर सांगतो. पुन्हा फोन करीन तेव्हा

तपशिलात बोलू.''

''डॉक्टर, ३०, ३१ मे आणि १ जून २०२५ रोजी शहादा येथे विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठक संपन्न झाली. कोरोनाचा काळ वगळला तर आपल्या सर्व बैठका तेवढ्याच नियमित आणि तेवढ्याच शिस्तीत पार पडतात. या बैठकीने उपस्थितीचा उच्चांक गाठला. एकूण ३५ जिल्ह्यांतील जवळपास ४२५ कार्यकर्ते उपस्थित होते. मिनी अधिवेशनच होते ते.''

''काय म्हणालात? संघटनात्मक सुस्थितीचे द्योतक आहे? हो, खरे आहे. ही बैठक त्रैवार्षिक राज्य कार्यकारिणी निवडीची बैठक होती. आपली म्हणजे फक्त आपलीच बरं का, राज्य कार्यकारिणी निवड प्रक्रिया गेली तीस वर्षे अतिशय लोकशाही पद्धतीने, त्याच शिस्तीत व तेवढीच पारदर्शकरीत्या पार पडते. आनंदाची बाब म्हणजे तुमचा लाडका संजय बनसोडे राज्य कार्याध्यक्ष झाला. संघटनेच्या शाखेतील क्रियाशील कार्यकर्ता पदापासून उमेदवारी करीत बनसोडे सर कार्याध्यक्ष पदापर्यंत पोहोचले आहेत. संघटनेला आणखी पुढे नेतील अशी क्षमता आणि दृष्टी त्यांच्याकडे आहे. आणि हो, मागील कार्यकारिणीत माधव बावगे सरांना आम्ही आग्रहपूर्वक कार्याध्यक्ष केले होते. संघटनेची ती गरजही होती. त्यांनी शंभर टक्के न्याय देऊन संघटनेला खऱ्या अर्थाने स्थैर्य मिळवून दिले. बावगे सरांसारखा ऊर्जावान माणूस कामात राहावा म्हणून अध्यक्षपदासाठी सर्वांचीच त्यांना पसंती होती. बावगे सर आता संघटनेचे अध्यक्ष झालेत. विशेष कौतुकाची गोष्ट म्हणजे यावेळी कार्यकारिणीत २०% नवीन चेहरे आहेत. विद्यार्थिदशेपासून कामात असलेले पण अजून तरुण असलेल्यांत तुमचा आवडता विनायक, बावगे सरांची वैचारिक मानसकन्या रुक्साना हे आता राज्य प्रधानसचिव झाले आहेत. कृष्णात स्वाती, आरती नाईक हे तरुण सरचिटणीस आहेत. राज्य कार्यकारिणीत अनेक तरुणांना संधी मिळाली. अर्थातच त्यांनी संघटनेत कर्तृत्व सिद्ध केले आहे.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट. तुमच्या वैशिष्ट्यपूर्ण शब्दांत सांगायचे, तर संघटना सतत 'वर्धिष्णू' असावी. त्याप्रमाणे या वर्षापासून आपण गरजेनुसार काही नवीन कामाचे विभाग सुरू केलेत. जसे, संविधान जागर विभाग, व्यसन : प्रबोधन व संघर्ष विभाग, सर्वेक्षण व संशोधन विभाग आणि शासन-प्रशासन, समविचारी संस्था-संघटना संपर्क समन्वय विभाग.''

''हो, हो आता तेच सांगत होतो. तुम्ही असताना नुकतेच सुरू झालेले जातपंचायत मूठमाती अभियान विभाग, जोडीदाराची विवेकी निवड विभाग, तुमच्यानंतर सुरू केलेले सोशल मीडिया व्यवस्थापन विभाग, सांस्कृतिक अभिव्यक्ती विभाग हे सर्वच विभाग चांगलेच फ्लरीश झाले आहेत. एक गोष्ट अभिमानाने सांगतो, आपण ज्या विकेंद्रित कार्यपद्धतीचा विचार केला होता ती आणि सांघिक नेतृत्वाची कल्पना आता संघटनेत चांगलेच बाळसे धरू लागली आहे. महिला विभाग, युवा विभाग, वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प, प्रशिक्षण विभाग अशा कितीतरी विभागांच्या स्वतंत्र यंत्रणा उभ्या राहत आहेत. त्या त्या विभागांतर्गत नवनवीन उपक्रम होत राहतात. सोशल मीडियाच्या सर्वच हॅन्डल्सवर महाराष्ट्र अंनिस सक्रिय आहे. आपली वेबसाईट अपडेट झाली आहे, तरी या क्षेत्रात अजून खूप स्कोप आहे. युवा विभागातर्फे दर्जेदार छावणी सुरू झाली आहे.''

''होय डॉक्टर. अमळनेरच्या सानेगुरुजी कर्मभूमी स्मारकाची छावणीदेखील चांगली होते. तुमच्या लक्षात आहे तर!''

''डॉक्टर, हे सर्व छान छान सांगतो आहे. पण अजून अधिक चिवटपणे, अधिक सघनपणे, अधिक गांभीर्याने, अधिक प्राधान्याने काम करण्याची खूप गरज आहे हेही जाणवते. त्यासाठी वाचन वाढविणे, प्रशिक्षण हे महत्त्वाचे आहेच. तसे प्रयत्नही सुरू आहेत. जिल्हा सक्षमीकरणावर भर राहणार आहे. कार्यकारी समितीने विविध विभागांची मेंटॉरशीप वाटून घेतली आहे. त्यातून प्रत्येक विभागाचे काम गतिमान करण्याचा प्रयत्न आहे. वीक असलेले जिल्हे दत्तक घेतले आहेत.''

''या वाचनावरून आठवले. सध्या महाराष्ट्रात वाचन संस्कृती जिवंत ठेवण्यात अंनिसचा महत्त्वाचा वाटा आहे. आपले कार्यकर्ते सर्वाधिक पुस्तके खरेदी करतात, विक्री करतात. वाचन करतात आणि लिहितात सुद्धा. कार्यकर्त्यांची आपल्या विषयावरील पुस्तके आपण विवेक जागर प्रकाशनामार्फत छापली. एकट्या शहादा शाखेने दिवाळी बुक फेस्टिव्हलमध्ये साडे सात लाखांची पुस्तके विकली.''

''हो हो, साडे सात लाखांची. विश्वास बसत नाही ना? पण हे खरे आहे. विशेष म्हणजे त्या उपक्रमात सातत्य आहे. ऐन दिवाळीत कार्यकर्ते रात्री अकरा वाजेपर्यंत स्टॉल सांभाळतात. खूप कामे असतात, तरीही

सर्वजण एकोप्याने आनंदाने करतात.''

''डॉक्टर, विनायक आता संघटना बांधणी या विषयाचा तज्ज्ञ प्रशिक्षक बनला आहे. संघटनेबद्दल त्याने जेवढे चिंतन केले असेल, क्वचितच अन्य चळवळीतील कोणी केले असेल. त्याने समाजमाध्यमांवर एक लेखमाला चालविली. प्रचंड प्रसिद्धी मिळाली. अनेक वेगवेगळ्या क्षेत्रातील लोकांचे फोन आले. त्याचे लेखांचे पुस्तक करायचे आहे.''

''पण डॉक्टर, एक सांगतो. अजूनही परिस्थिती खूप गंभीर आहे. तुम्ही म्हणायचेत ना की, ही शतकांची लढाई आहे. ते अगदी खरे आहे. नंदुरबार जिल्ह्यातील एका महिलेने डाकीण असल्याची बदनामी सहन न झाल्याने आत्महत्या केली. तर बिहारच्या पूर्णिया जिल्ह्यात चेटूक करण्याच्या संशयाने एकाच कुटुंबातील पाच जणांची जिवंत जाळून हत्या करण्यात आली. या घटना अंगावर शहारे आणतात आणि जादूटोणा विरोधी कायदा देशपातळीवर लागू करण्याची आवश्यकता स्पष्ट करतात.''

''डॉक्टर, त्या दृष्टीनेही काम सुरू आहे. त्यासाठीचा सुधारित कायदा मसुदा तयार करण्यासाठीच्या तीन चार बैठका होऊन आपल्या कायदा विभाग व तज्ज्ञांनी मसुदा अंतिम केला आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका हे संघटनेचे अधिकृत मुखपत्र. सध्या त्याच्या दरमहा साडेसहा हजार प्रती छापतो. त्याचा खूपच चांगला सेट अप बसला आहे. तुम्हाला कल्पना आहेच प्रा. डॉ. नितीन शिंदे सर संपादक आहेत तर उत्तम जोगदंड सर कार्यकारी संपादक. शिंदे सर आता महाविद्यालयाचे प्राचार्य झाले आहेत. त्यांच्या जबाबदाऱ्या वाढल्या आहेत. पण अंकावर परिणाम होऊ देत नाहीत. डॉ. श्यामसुंदर मिरजकर, अजय भालकर, प्रल्हाद मिस्त्री, राजेंद्र फेगडे, डॉ. बाळू दुगडुमवार अशी आधीची टीम आहेच. त्यांच्या जोडीला हंसराज महाले हा नंदुरबार जिल्ह्यातील तळोद्याचा तरुण मित्र संपादक मंडळात सहभागी झाला आहे. आळंदीच्या अधिवेशनाचे सर्व रिपोर्टिंग हंसराज आणि विश्वजितने केले होते.''

''हो. विश्वजित जळगावचा. कदाचित हंसराजला तुम्ही नाही ओळखणार. तुम्ही असताना नुकताच संघटनेत जोडला गेला होता.''

''ओहो, ते राहिलेच. घरी सर्व मजेत आहेत. माझ्या बाबांबद्दल विचारता? होय, भाईसुद्धा ठणठणीत आहेत. त्यांना या ऑगस्टमध्ये ८७ वे सुरू होईल. नेहमीप्रमाणे भरपूर वाचन करतात. चिकित्सकपणे वाचतात. संशोधनात्मक वाचतात. विशेष म्हणजे आपल्या प्रत्येक अधिवेशनाला आवर्जून उपस्थित राहातात. आळंदीला देखील होते. महाराष्ट्र अंनिसच्या अशा मोठ्या कार्यक्रमात आता आमच्या कुटुंबातील तीन पिढ्या असतात. भाई म्हणजे बाबा, मी, बहीण डॉ. प्रतिभा, मिसेस सुषमा, पुतण्या प्रबोध आणि मुली मृणाल व तन्वी एवढे नक्कीच असतो. आम्हालाच खूप भारी वाटते.''

''हो, एक राहिले डॉक्टर. माझी थोरली बहीण सौ. प्रतिभा वाणी गुजराथला वापी येथे असते. गृहिणी आहे. तिने वयाच्या ५५ व्या वर्षी २०२२ मध्ये तुमच्या साहित्यावर पीएच.डी. केली आणि विशेष कौतुकाची बाब म्हणजे तुमच्या साहित्यावर पीएच.डी. करणारी ती पहिली स्कॉलर ठरली. त्यावरही कडी म्हणजे तिला मुंबईच्या एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाचे या विषयासाठीचे गोल्ड मेडल मिळाले आहे. अफाट सामाजिक कामामुळे तुमची 'साहित्यिक' ही ओळख दुर्लक्षित होऊ नये, अशी तिची यामागची प्रेरणा.''

''हो हो, तुमची कधी भेट झाली नव्हती. तुम्ही तिचे अभिनंदन केले आहे आणि तुम्हाला खूप आनंद झाला हे नक्की कळवतो. तिला किती भारी वाटेल ना!''

''बापरे! डॉक्टर, खरंच खूप गप्पा झाल्या. मजा आली.''

''काय विचारता? अविनाशबद्दल? मी काय बोलू डॉक्टर? माणसाने आपले दुःख - वेदना व्यक्तिगत ठेवाव्यात. आनंद सर्वांमध्ये वाटावा. नको, आता फोनवर नको. त्यासाठी खरंच शक्य असते तर प्रत्यक्षच भेटलो असतो. कोठे सांगू?''

''अगदी बरोब्बर! मला आणि विनायकला आमच्या पत्रासंदर्भात बोलायला पूर्ण एक दिवस वेळ दिला होता त्या पाटणादेवीच्या वन विभागाच्या डॉर्मिटरीत! नक्की नक्की. खरंच डॉक्टर, तुमच्यासोबत किती भारी संवाद व्हायचा ना! अगदी पत्रातून असो, फोनवर असो वा प्रत्यक्षसुद्धा.''

''डॉक्टर, मध्यंतरी तुमचं एक जुनं पत्र सापडलं. १९९७ सालचं असावं. तुमच्या माझ्याविषयीच्या भावना स्पष्ट करणारं. मी काही दिवस टायफॉइडने आजारी होतो आणि बैठकीला येऊ शकलो नव्हतो, तेव्हा लिहिलेलं. थांबा, वाचूनच दाखवतो. ऐका...

**(पृष्ठ क्रमांक १९ वर)**

# हे तुम्ही करावं... ते तुम्हीच करावं...



**दिगंबर कट्यारे** । जळगाव
मो. ९८६०३११३२२

''हे तुम्ही करावं''

हे शब्द होते डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे. आधारस्तंभ पुरस्कार घेताना डॉक्टरांनी मला आवर्जून सांगितले होते, हे तुम्ही करावं असा माझा आग्रह आहे.

मी त्यांना म्हटलं, ''होय, हे काम माझं आवडतं आहेच. मी ते काम जरूर करेन; पण त्यासाठी मला जरा मोकळा वेळ हवा.''

डॉक्टर म्हणाले, ''निवृत्तीनंतर तुम्ही करालच याची खात्री आहेच. तोपर्यंत तुम्ही यांना मदत करावी.'' मला त्या कामात रस होताच; परंतु तेव्हापासून मी त्या कामात अधिक क्रियाशील झालो.

कोणतं काम होतं ते? ते काम आजही चालूच आहे, वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभागाचे, शिक्षकांचे प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे. त्यावेळी हा प्रकल्प राज्यात थंडावला होता. तरीही मी मात्र जळगाव जिल्ह्यात या कामाला गती दिलेली होती. जळगाव जिल्ह्यात मी दरवर्षी शिक्षकांची किमान दोन प्रशिक्षण शिबिरे आयोजित करीत होतो. सुरुवातीला स्वतः डॉक्टर शिबिरासाठी मार्गदर्शक होते. त्यात अनेक विषय घेत असत. सोबतीला डॉ. प्रदीप जोशी, अविनाश पाटील आणि अजूनही काही कार्यकर्ते सोबत होतेच. त्यात थोड्या वेळासाठी चमत्कार सादरीकरण मी करीत होतो.

काही दिवसांनी माझ्या शाखेच्या गावी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात मला यश आले. त्यानंतर माझा आत्मविश्वास वाढला आणि मग आम्ही शेजारच्या तालुक्यातील कार्यकर्त्यांची एक फळी तयार केली. आम्ही एकत्र आलो. जवळच्या तालुक्यात पाचोरा, चाळीसगाव येथे शिबिरे आयोजित करू लागलो. डॉक्टर चाळीसगाव शाखेला नेहमीच भेटी द्यायला येत असत. त्यांचा तो दौरा पाचोरा, भडगावमार्गे असायचा. त्याचा फायदा घेत आम्ही त्यांच्या दौऱ्यादरम्यान शिक्षक प्रशिक्षण शिबिरे देखील आयोजित करायचो.

**...आणि डॉक्टरांचा हात माझ्या पाठीवर**

मलाही असं वाटायचं की, आपल्या शाखेच्या वतीने आपल्या गावात डॉ.दाभोलकर यांचं जाहीर व्याख्यान व्हावं म्हणून मी एकदा दोन महिने अगोदर तारीख निश्चित केली. अक्षरशः मी आणि माझे दोन-चार सहकारी कार्यकर्ते सपाटून कामाला लागलो. गावातील सर्व विद्यालयातील शिक्षकांना भेटून कार्यक्रमाची रूपरेषा सांगून त्यांना आग्रहाचे निमंत्रण दिले. गावातील सर्व कार्यालयांच्या कर्मचाऱ्यांनाही भेटून व्याख्यानाला येण्याचा आग्रह केला. हँडबील छापलेत. अशी जाहिरातीतून खूप प्रसिद्धी केली. व्याख्यानाचे स्थळ म्हणून माझी शाळा निवडली. अशी सर्व जय्यत तयारी केली. आम्हाला वाटले, व्याख्यानाला लोकांची खूप मोठी गर्दी होईल. पण साथींनो, खेदाने सांगावे लागते की, त्या व्याख्यानाला फक्त पंधरा ते वीस लोकांची उपस्थिती होती. मी खूपच नाराज झालो. काय करावं ते सुचेना.

माझा चेहरा रडवेला पाहून डॉक्टरांनी माझ्या पाठीवर हात ठेवला आणि जे म्हटलं ते मी त्यानंतर आजही अनुभव घेत आहे. ते वाक्य होतं, 'कट्यारे सर, हे असंच असतं! तुम्ही दोनशे टक्के काम केले, याची मला जाणीव आहे; पण आपण निराश होऊ नका. हे असंच चालणार आहे. प्रवाहाच्याविरुद्ध आपण काम करीत आहोत, ही जाणीव असू द्यावी.' यावेळी माझ्या पाठीवर हात ठेवून डॉक्टरांनी जे बळ मला दिले त्या बळाच्या शिदोरीवर मी आजही जोमाने क्रियाशील आहे.

''मित्रहो, आपण एक गोल राऊंडमध्ये बसू या,'' असं डॉक्टरांनी आलेल्या श्रोत्यांना सांगितलं आणि नेहमीच्याच जोमाने, त्याच जोशात डॉक्टरांनी नियोजित वेळात आपले विचार व्यक्त केलेत. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात मोठ्या हेडलाईनखाली संपूर्ण व्याख्यान छापून आले. त्यानंतर मात्र गावातील अनेक लोकांनी एका चांगल्या व्याख्यानास आपण मुकलो, अशी खंत व्यक्त करीत प्रतिक्रिया दिल्या तेव्हा मला खूपच हायसं वाटलं.

त्या काळात आम्ही विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्यासाठी विविध परीक्षा देखील घेत असायचो. त्यात सत्यशोध परिचय, सत्यशोध प्रज्ञा प्रकल्प, सत्यशोध प्रबोध अशा विविध पातळ्यांवर परीक्षा घ्यायचो. त्यानंतर काही वर्षांनी स्वयंअध्ययन प्रश्नपत्रिका तयार करण्यात आल्या. हे काम मी मोठ्या

आनंदाने करीत होतो.

कदाचित डॉक्टरांनी हा माझा कल ओळखला असावा आणि म्हणूनच ते मला पुरस्कार देताना म्हणाले होते, ''हे तुम्ही करावं.''

आणि पुढे...

**''ते तुम्हीच करावं''**

असं कोण म्हणाले? साथींनो, हे म्हटले आहे आपल्या कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांनी, 'होय ते काम तुम्हीच करावं'. आणि ज्येष्ठसाथी माधव बावगे, डॉ. ठकसेन गोराणे आणि कार्यकारिणी यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम आजही चालूच आहे.

आपल्या संघटनेत निरखून पारख करणारी अशी माणसे आहेत. त्यातूनच काम करणाऱ्यांना स्वतंत्र अवकाश जातो. आपली संघटना सर्वानुमते विभाग पदाधिकाऱ्यांची निवड करते, त्यांना संधी देते, स्वातंत्र्य देते, अवकाश देते. कामाचे मूल्यमापनदेखील करण्यात येते. आपले कार्यकर्ते मिळालेल्या संधीचं सोनं करतात. जीवापाड मेहनत करतात. पायाला भोवरा असल्यासारखे आपले प्रमुख पदाधिकारी सारा महाराष्ट्र पिंजून काढतात. आपली जबाबदारी स्वीकारून ध्येय आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देत असतात. सर्व विभाग सक्षम करण्यासाठी प्रयत्न करतात. वारंवार ऑनलाईन, ऑफलाईन बैठका आयोजित केल्या जातात. संपूर्ण महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र अंनिस हे एक आदर्श संघटन आहे.

**हे येतं कुठून?**

राज्य प्रधानसचिव विनायक सावळे नेहमी म्हणतो, 'हे येतं कुठून?'

हे येतं, डॉक्टरांच्या प्रेरणेतून, त्यांच्या पुस्तकांच्या वाचनातून, त्यावरील सखोल चिंतनातून. डॉक्टरांनी लिहिलेली पुस्तके वारंवार वाचली तर त्यातूनच हे येतं. हे येतं आपल्याच पदाधिकाऱ्यांच्या समर्पित कार्यशैलीतून. त्यांची विचारसरणी, त्यांचं संघटनकौशल्य पाहून, त्यांचा उत्साह पाहून, त्यांची कार्यक्षमता पाहून, यातूनच येतं.

आपण याच विवेकी विचारांनी आपले नाते घट्ट झालेले आहे. याच विवेकी विचारांनी आपण सर्व साथी एकमेकांच्या हातात हात घालून 'हम होंगे कामयाब' म्हणत वाटचाल करीत आहोत. हे सर्व तेथूनच येतं.

आता माझ्यासारखे काही ज्येष्ठ आहेत. असं म्हणतात की, कार्यकर्ता थकत नाही, त्याने थकायला नको. त्याने आजारी पडायला नको. कार्यकर्ता आजारी पडला म्हणजे त्याने कोठेतरी स्वतःवर अन्याय केला असे म्हणायला हरकत नाही. आणि मी आजारी पडू नये म्हणूनच सेवानिवृत्तीनंतर वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभागाचे कार्य हाती घेतले. आनंदाने मला माझं आवडतं काम करायला मिळालं आहे, हे समाधान व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्दच नाही. माझे सहकारी, मार्गदर्शक आणि आपल्या अनेक साथींच्या सहकार्याने या विभागाला अधिकाधिक सक्षम करण्याचे पुरेपूर प्रयत्न होत आहेत.

मित्रांनो, लक्षात घ्या; वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभाग अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी हातभार लावला तर समाजात वैचारिक घुसळणही होईल आणि त्याचबरोबर वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्यासाठी प्रबोधनही होईल. माझ्यासारखे अनेक कार्यकर्ते, शिक्षक प्रशिक्षण शिबिरातूनच आलेले आहेत. संघटना वाढविस्तारासाठी प्रशिक्षण शिबिरे घेणे आवश्यक आहे. तसेच पुढील पिढीसाठी स्वयंअध्ययन प्रकल्पदेखील राबविणे आवश्यक आहे.

**राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टीकोन दिन**

'ऑल इडिया पीपल्स सायन्स नेटवर्क' आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पुढाकाराने व इतर अनेक समविचारी संघटनांच्या सहमतीने शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त २० ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टीकोन दिन म्हणून संपूर्ण भारतात साजरा करण्यात येतो. त्यानिमित्ताने आपण डॉक्टरांच्या प्रेरणेतून शिक्षक प्रशिक्षण शिबिरे आणि स्वयंअध्ययन प्रकल्प या उपक्रमांना अधिक गती देऊ या.

**हे करून पहाच**

आपल्या अनेक जिल्ह्यांत हे उपक्रम राबविले जातात. आपण शिक्षक प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करतो त्यावेळी उपस्थित प्रशिक्षणार्थींना किमान वीस प्रश्नपत्रिका संच द्यावेत. एका शिबिरात किमान पन्नास प्रशिक्षणार्थी असतील तर आपल्या किमान एक हजार प्रश्नपत्रिका दिल्या जातील. आपण त्या प्रशिक्षणार्थींना पहिल्या सत्रानंतर सूचना दिल्यास ते अवश्य प्रश्नपत्रिका संच विकत घेतील. अनेक विद्यालयात प्रश्नपत्रिका गेल्यावर तेथे त्यावर चर्चा होते आणि मग ते आपल्याकडे अधिक मागणी करतात असा आजवरचा अनुभव आहे. आपण अशाप्रकारे हा उपक्रम राबवून राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टीकोन दिन साजरा करून तो दिवस सार्थक करू या.

**(लेखक महा.अंनिसचे वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभागाचे राज्य कार्यवाह आहेत.)**

●

# ...या घोषणेला अर्थ आहे!



**विनायक सावळे।** शहादा (नंदुरबार)
मो.९४०३२५९२२६

२० ऑगस्ट २०१३ ची ती सकाळ भयंकर धक्क्याने उजाडली. डॉक्टर दाभोलकरांच्या खुनाची बातमी वाऱ्यासारखी पसरली. आधी तर काहीच सुचत नव्हतं. सर्वच सुन्न मनोवस्थेत होते. सारेच आहे त्या परिस्थितीत साताऱ्याकडे निघाले. हे कसं झालं? का झालं? कुणी केलं? कसं केलं? इतका तर्क करण्याचीही शक्ती उरली नव्हती. सर्वच एकमेकांना सावरत होते. अनेक हात हातात गुंफलेले होते. डोकं टेकवण्यासाठी अनेक खांदे होते. आम्हीच एकमेकांना धीर देत होतो. मिठीत घेत होतो. कोसळलेलं मन सावरत होतो. त्या चितेच्या ज्वालांनी आतही एक आग निर्माण केली होती. ती आग निर्धाराच्या घोषणांनी बाहेर पडत होती.

डॉक्टरांच्या खुनाने धक्क्यात असलेले कार्यकर्ते 'लढेंगे, जितेंगे', 'शहीद डॉक्टर नरेंद्र दाभोलकर, अमर रहे', 'विवेकाचा आवाज, बुलंद करू या!' या घोषणांसोबतच 'फुले-शाहू-आंबेडकर, आम्ही सारे दाभोलकर' अशी घोषणा देत होते. डोळे अश्रूंनी डबडबत होते, हुंदके दाटून येत होते, रक्त सळसळत होते, घोषणा गर्जत होत्या, तरीही वातावरण विवेकी संयमाने भरले होते. अस्वस्थ वातावरणात अनेक प्रश्नांनी प्रचंड अस्वस्थ झालेल्या मनांना या घोषणा आधार देत होत्या. कोसळलेल्या कार्यकर्त्याला त्या भयंकर परिस्थितीतही या घोषणा उभे करत होत्या. 'दाभोलकरांची अपुरी लढाई आता आपल्यालाच लढायची आहे', अशी मनाशी खूणगाठ पक्की करत होत्या, घट्ट करत होत्या.

या साऱ्याच घोषणांनी आम्हाला बळ दिले. विश्वास दिला. वेदनेला मोकळं व्हायला जागा दिली. संतापाला, दुःखाला कृतीची जोड दिली. रागाला व्यक्त व्हायला सृजनशील कृतीचा मार्ग मिळाला. आम्हा साऱ्यांना खऱ्या अर्थाने बळ देणारी जर कोणती घोषणा असेल तर ती आहे,

'फुले-शाहू-आंबेडकर,
आम्ही सारे दाभोलकर!'

या घोषणेने आम्हाला ताकद दिली. 'आम्ही सारे दाभोलकर'चा शाब्दिक अर्थ आहे, 'आम्ही प्रत्येक जण आता डॉ. नरेंद्र दाभोलकर आहोत.' पण हा तेवढाच अर्थ नाही. यात आमची स्वप्ने, निर्धार, आम्ही स्वतःलाच दिलेलं वचन, जबाबदारीची गंभीर जाणीव, विचार अमर्त्य असल्याचा विश्वास, असं बरंच काही या घोषणेत दडलेलं आहे.

शहीद डॉ.दाभोलकरांच्या स्मृतींच्या निमित्ताने या घोषणेकडे आम्ही सारे कार्यकर्ते कसे बघतो? अनेक आंदोलनांत, लढ्यांत, सत्याग्रहांत घोषणा तयार होतात. घोषणा या आपल्या मागणीसाठी, आपल्या निर्धारासाठी, आपल्या विचारांच्या उद्घोषासाठी, स्वतःच स्वतःला प्रेरित करण्यासाठी अशा अनेक अर्थाने वापरल्या जातात. २३ वर्षांचा तरुण भगतसिंग 'इन्किलाब जिंदाबाद' च्या घोषणा देत होता. १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत सामान्य भारतीय हाती तिरंगा घेऊन ब्रिटिश साम्राज्याला 'चले जाव' घोषणेने ललकारत होता. तेव्हा कितीतरी जणांच्या अंगावर रोमांच उभे राहात असतील. स्वातंत्र्याची आस प्रखर होत असेल. या देशाच्या स्वातंत्र्यासाठी 'करो या मरो'चा निर्धार व्यक्त करताना स्वतःचा जीव देणंही किती क्षुल्लक गोष्ट आहे, अशी उदात्त भावना तयार होत असेल. घोषणा खरोखर किती काम करतात! हा अनुभव गेली १२ वर्षे आम्ही स्वतः घेत आहोत. 'आम्ही सारे दाभोलकर' या घोषणेनेही हाच रोमांच आम्ही अनुभवला आहे, अनुभवत असतो.

या घोषणेतून आम्हाला कोणत्या प्रेरणा मिळतात? घोषणेमागील आमच्या भावना काय आहेत?

**वैचारिक वारशाची कबुली**

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी जी विचारांची पेरणी केली तेच आमचे जीवनध्येय आहे. विज्ञान तंत्रज्ञान ते वैज्ञानिक दृष्टीकोन, वैज्ञानिक दृष्टीकोन ते अंधश्रद्धा निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन ते धर्मचिकित्सा, धर्मचिकित्सा ते धर्मनिरपेक्षता, धर्मनिरपेक्षता ते विवेकवाद आणि विवेकवाद ते मानवतावाद, ही ती विचारांची शृंखला आहे. मानव समूहाला सर्वाधिक सुखी

आणि समृद्ध करणारा हाच खात्रीशीर मार्ग. या विचारालाच महाराष्ट्रात 'फुले-शाहू-आंबेडकर विचार' असे म्हटले जाते. म्हणून घोषणेची पहिली ओळ म्हणजे ह्या विचारांचे निदर्शक असणारे शब्द आहेत. या विचारांमध्येच खरी समाजपरिवर्तनाची ताकद आहे, हा डॉक्टरांचा विश्वास होता आणि हाच त्यांचा लढा होता. आता ही लढाई आमचेही जीवनध्येय झालेले आहे. हा विचार आमचे जीवनमूल्य आहे. आम्ही दाभोलकरांचे केवळ अनुयायी नाहीत, तर त्यांच्या कार्याचा वारसा कृतिशीलपणे पुढे नेणारे, वृद्धिंगत करणारे स्वतः दाभोलकर आहोत. ही आमची भावनिक आणि वैचारिक भूमिका आहे. हे आता आमच्या आत, खोल भिनलं आहे. रक्तात पोहोचलं आहे. असा या घोषणेचा एक मूल्य-आशय आम्ही मानतो.

**माणूस मेला तरी विचार मरत नाहीत**

'आम्ही सारे दाभोलकर' ही घोषणा अनेकांना स्वप्नाळू वाटू शकते. बळेबळेच व्यक्त केलेली सदिच्छा वाटू शकते. पण ज्या तडफेने संघटना दाभोलकरांच्या खुनानंतरही उभी राहिली, वाढली, विस्तारली, अनेक अंगांनी फुलली या अनुभवाने तर मात्र हे स्पष्ट केले की, माणूस मेला तरी विचार मरत नाहीत. कार्यकर्ते त्यांच्या कृतीतून विचारांचे सतत पुनरुज्जीवन करीत असतात.

कार्याच्या रूपाने दाभोलकर आजही जिवंत आहेत. किंबहुना त्यांचे विचार अधिक कृतिशील झाले आहेत. ज्यांना फक्त दाभोलकरांचे कार्य दुरूनच माहीत होते असे अनेक कार्यकर्ते 'आता हे काम पुढे नेण्यासाठी मी पुढे राहिले पाहिजे', अशा विचारांनी संघटनेला येऊन मिळाले आहेत. काम वाढलंय, काम करणारे हात वाढले आहेत. नव्या नव्या कल्पना पुढे येत आहेत. तरुणाईला मोठ्या प्रमाणात संधी दिली जाते आहे. भविष्यवेधी चिंतन केले जाते आहे. संघटनेची उपयोगिता आणि कालसुसंगतता टिकून आहे म्हणून ही घोषणा 'डॉ. दाभोलकर गेल्याने चळवळ थांबणार नाही', हा संदेश देते.

या घोषणेतून कार्यकर्ते निर्धार करतात की, माझ्यावर आता या कार्याची जबाबदारी आहे. ती पेलण्यासाठी मी सक्षम बनले पाहिजे. कदाचित काही मोह मला खुणावतील, दुसऱ्या संधी मला इशारा करतील, माझ्या महत्त्वाकांक्षा मला डळमळीत करतील. संघटनेला बाजूलाच ठेवत, माझ्या कौशल्याच्याआधारे मी वेगळी वाट चोखाळण्याचीही मला इच्छा होईल. परंतु या साऱ्यांवर मात करण्याची मला ताकद देणारी घोषणा आहे, 'आम्ही सारे दाभोलकर'.

**शहीदत्वाचे दैवतीकरण नाही, कृतिशील निर्धारात रूपांतर**

डॉ. दाभोलकरांचा खून हा एक वैचारिक खून होता. हे तपास संस्थानीच न्यायालयात सांगितले आहे. विचारांची लढाई विचारांनी करण्यासाठी विरोधक जेव्हा निर्बल ठरतात, तेव्हा ते अपयशाच्या भीतीने आणि पराभूत मानसिकतेने असा वार करतात. हा वार म्हणजे एक प्रकारे त्यांच्या अपयशाची कबुलीच असते. दुसऱ्या बाजूला आम्हाला या वैचारिक लढाईच्या परिणामांची जाणीव आहे. ही लढाई अनेक शतके चालणार आहे. निराश न होता, न खचता ही लढाई दीर्घकाळ लढावी लागणार आहे. त्यासाठी डॉक्टर दाभोलकरांच्या बलिदानाचे आम्ही दैवतीकरण होऊ देणार नाहीत, तर त्यांच्या बलिदानाचे 'कृतिशील निर्धारात रूपांतर करू' अशी जबाबदारी आम्ही घेतली आहे; असाही या घोषणेतील एक अर्थ आहे. आमच्या निर्धाराला बलिदानाचे बळ आहे.

**सामूहिक ओळख व संघटनेशी एकात्मता**

यातील 'आम्ही सारे' हा शब्दही तितकाच महत्त्वाचा आहे. यात आमचा हा सामूहिक निर्धार आहे. 'हातात हात घालून, हृदयास हृदय जोडून, ऐक्याचा मंत्र जपून' अशी भावना त्यात आहे. आम्ही सारेच या भावनेने एकमेकांशी जोडलेलो आहोत. आम्ही सारेच एक आहोत. आमचे ध्येय एक आहे. आमचा मार्ग एक आहे. ही एकत्वाची भावना या कृतीची खरी ऊर्जा आहे. खरेतर या निर्धाराची ही पूर्वअटच आहे.

आम्हा साऱ्यांचा आर्थिक, सामाजिक, बौद्धिक स्तर वेगवेगळा आहे. आमचे गुण, कौशल्य, विचारपद्धती, दृष्टिकोन यातही भिन्नता आहे. अर्थातच आम्हा साऱ्यांचीच मानसशास्त्रीय जडणघडण (सायकॉलॉजिकल फ्रेम) वेगवेगळी आहे. माणूस म्हणून गुणांसह अनेक दोषही आमच्यात आहेत. पण जेव्हा आम्ही 'आम्ही सारे दाभोलकर' अशी घोषणा देतो, तेव्हा या साऱ्यांवर मात करण्याची जबाबदारी आम्ही सामूहिकरीत्या स्वीकारतो. अपयशाची जबाबदारीही आमचीच. तेव्हा मतभेद होऊन, नाराज होऊन थांबण्याचे मार्ग बंद झालेले असतात. आहे त्या परिस्थितीत मार्ग शोधण्याची तयारी ठेवायची असते. निराश व्हायचे नसते. याची वेळोवेळी जाणीव करून

देण्याचे काम देखील ही घोषणा करते.

**भीतीला न जुमानता कार्य करण्याची हिंमत**

डॉ. दाभोलकरांचा मॉर्निंग वॉकला जात असताना गोळ्या झाडून खून करण्यात आला. पण त्यातून कोणतीही दहशत, भीती आमच्या मनात निर्माण झालेली नाही. राज्यभर आम्ही 'निर्भय मॉर्निंग वॉक'सारखे उपक्रम करीत असतो. एक दाभोलकर संपवले, पण हजारो दाभोलकर तयार झालेले आहेत. अशा कोणत्याही दहशतीला, भीतीला हे नवे दाभोलकर भीक घालणार नाहीत. ही घोषणा हे कार्य अधिक जोमाने, अखेरच्या श्वासापर्यंत सुरू ठेवू, लढवत राहू असा निर्धार देते.

ही घोषणा केवळ दाभोलकरांच्या कार्याला आदरांजली नाही, तर 'त्यांच्या विचारांचे जिवंत रूप आम्हीच आहोत असे ठामपणाने जाहीर करणे आहे'. ही घोषणा म्हणजे एक भावनिक, वैचारिक आणि कृतिशील प्रतिज्ञा आहे. ती केवळ डॉक्टर दाभोलकरांच्या आठवणीसाठी दिली जात नाही, तर त्यांच्या विचारांनी चालण्यासाठी, अंधश्रद्धांविरुद्ध संघटित लढाईचा कायम भाग राहण्यासाठी, विवेकवादाचा वसा जपण्यासाठी ती जाहीरपणे घेतलेली शपथ आहे.

पुन्हा पूर्ण जोशात, जोमात, आतून, हृदयातून ही घोषणा देऊ या,

'फुले-शाहू-आंबेडकर,
आम्ही सारे दाभोलकर!'

**(लेखक महाराष्ट्र अंनिसचे राज्य प्रधानसचिव आहेत)**

●

---

**(पृष्ठ क्रमांक १४ वरून )**

प्रिय परेश शाह,

स.न.

तुझी प्रकृती चांगली असेल अशी आशा आहे. गेले अनेक दिवसांत तुझी निवांत भेट झाली नाही हे जाणवते. सातारच्या दोन्ही शिबिरांना आणि त्या आधीच्या कार्यकारिणीला देखील तू येऊ शकला नाहीस. तुझ्यासारख्या उत्साही, कार्यक्षम, दूरदृष्टी असलेल्या तरुणाचा प्रतिसाद आणि सहभाग संघटनेत आणि चळवळीत मला खूप मोलाचा वाटतो. किंबहुना आता ही चळवळच तुमच्या खांद्यावर सोपवायची आहे. कौटुंबिक जबाबदाऱ्या, व्यावसायिक अडचणी, प्रकृती या साऱ्यांचे योग्य भान राखूनही यापुढील संघटनेच्या जडणघडणीच्या महत्त्वाच्या कामामध्ये तू माझ्यासोबत (खरेतर माझ्या पुढे) असशील असा विश्वास बाळगतो.

सोबत गुजराती पत्रिका पाठवत आहे. त्यांच्या संपर्कात राहावे व त्यांना माझ्याऐवजी तुलाच ही पत्रिका पाठवण्यास सांगावे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या महिला शिबिरातील जी रक्कम (पुस्तक विक्रीची) पाठवायची असेल ती पांगे यांना त्वरित पाठवून द्यावी. तसेच शिंदखेडा, नंदुरबार, चिमठाणे व धुळे येथे शाखा असतील तेथे क्रियाशील कार्यकर्ता यादीही त्वरित पाठवावी. घरातील सर्वांना नमस्कार. सहकाऱ्यांनाही नमस्कार.

तुमची पतपेढी चालू झाली का?''

स्नेहांकित,

नरेंद्र दाभोलकर

''डॉक्टर, तुमचे हे पत्र प्रातिनिधिक आहे. तुम्ही तरुणांवर दाखवित असलेला विश्वास, त्यांच्याबद्दलचा दृष्टीकोन, तरुणांकडून अपेक्षा, सगळ्यांची विचारपूस असेल, सर्व काही त्यात आहे. आम्हीही त्या कसोटीला परिपूर्ण उतरलो त्याचा मनस्वी आनंद आहे आणि हो, पतसंस्था उत्तमरीत्या सुरू आहे. आता २८ वर्षे पूर्ण होतील. जिल्ह्यातील नावारूपाला आलेली पतसंस्था आहे.''

''चला डॉक्टर, ठेवतो फोन. खूप छान वाटतंय. किती किती गप्पा झाल्या.''

''थँक्यू डॉक्टर. तुम्हाला खूप समाधान वाटले असेल हे ऐकून. मला त्यापेक्षा अधिक समाधान वाटते आहे. कारण संघटनेची वाटचाल योग्य दिशेने सुरू आहे याची ती पावती आहे. धन्यवाद, डॉक्टर! बोलत राहू.''

**(लेखक महाराष्ट्र अंनिसच्या निधी व्यवस्थापन विभागाचे राज्य कार्यवाह आहेत.)**

●



# जागतिक आदिवासी दिन : पार्श्वभूमी, सद्यस्थिती व भविष्यातील आव्हाने

**डॉ. राहुल पाटील** । जव्हार
मो. ९६२३०९२११३

दरवर्षी ०९ ऑगस्ट हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक आदिवासी दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. प्रस्तुत लेखक पालघर जिल्ह्यातील जव्हार या आदिवासी तालुक्यात नोकरीस आहेत. या ठिकाणी दरवर्षी ९ ऑगस्टच्या दिवशी आदिवासी बांधव मोठ्या संख्येने आपल्या पारंपरिक वेशभूषेमध्ये जव्हार शहरात जमतात व भव्य मिरवणूक काढून पारंपरिक वाद्यांच्या तालावर लोकगीते गात तारपा, गौरी, ढोल व इतर प्रकारची नृत्ये सादर करतात. अतिशय आनंदाने व उत्साहाने वातावरण भरून जाते. आजच्या दिवशी आदिवासी बांधव धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करतात. आपापल्या आदिवासी समाजाशी संबंधित त्या त्या ठिकाणच्या देवदेवतांच्या पूजाअर्चा करतात.




असे असले तरी,

हा दिवस नेमका का साजरा केला जातो?

हा दिवस नेमका केव्हापासून साजरा केला जातो?

यामागे नेमकी काय पार्श्वभूमी आहे?

हा दिवस फक्त महाराष्ट्रात, फक्त भारतात की, जागतिक पातळीवरही साजरा केला जातो?

हा दिवस साजरा करण्यामागे उद्देश काय आहे?

आदिवासी समाजाची भविष्यातील वाटचाल कशी राहील?

आदिवासी समाजाचे वर्तमान नेमके कसे आहे?

इत्यादी प्रश्नांची उत्तरे अनेकांना माहीत नसतात व या प्रश्नांचा विचार करण्याची त्यांना गरजही वाटत नाही. हा दिवस इतर दिवसांसारखा फक्त 'साजरा' केला जातो. परंतु या दिवशी जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने आदिवासी समाजाच्या हिताच्या, भविष्यातील वाटचालीच्या दृष्टीने जी चर्चा, चिंतन, विचारमंथन झाले पाहिजे, ते होताना दिसत नाही. तेव्हा या प्रश्नांवर थोडा प्रकाश टाकणे गरजेचे आहे.

आजच्या घडीला संपूर्ण जगात जवळपास ५००० आदिवासी समूह आहेत; ज्यांची लोकसंख्या ३७ कोटींच्या आसपास आहे. तसेच संपूर्ण जगात आदिवासींच्या जवळपास ७००० भाषा आहेत. आदिवासी समाज हा अतिशय शांतताप्रिय असून निसर्गाच्या सान्निध्यात राहणारा, निसर्गावर प्रेम करणारा व निसर्गाचे संरक्षण, संवर्धन करणारा आहे. असे असूनही जगात सर्वात जास्त शोषण हे आदिवासींचे झालेले आहे व आजही होत आहे. त्यांना मागासलेले, रानटी असे संबोधून हिणवले जाते. त्यांना त्यांच्या अधिकारांपासून, हक्कांपासून वंचित ठेवले जाते आहे. आदिवासींच्या जमिनी बळकावून त्यांच्या रहिवासापासूनच त्यांना विस्थापित केले जाते आहे. शिवाय त्यांच्यावर अन्याय, अत्याचार होतच आहेत.

ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन त्यांच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी १९६० च्या दशकात अमेरिकेत तसेच विविध देशांमध्ये चळवळी सुरू झाल्या. तेव्हा संयुक्त राष्ट्रसंघाने १९८२ मध्ये ९ ऑगस्ट रोजी जिनिव्हा येथे एका महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन केले. यानंतर पुढील काही वर्षे या विषयावर जागतिक पातळीवर बैठकांच्या माध्यमातून सतत चर्चा, विचारमंथन होत राहिले. पुढे संयुक्त राष्ट्रसंघाने १९९४ हे वर्ष 'आदिवासी वर्ष' म्हणून घोषित केले. तसेच १९९५ ते २००४ हे 'पहिले आदिवासी दशक' तर २००५ ते २०१४ हे 'दुसरे आदिवासी दशक' म्हणून घोषित केले. ९ ऑगस्ट १९८२ रोजी जिनिव्हामध्ये झालेल्या बैठकीची आठवण म्हणून ९ ऑगस्ट १९९५ हा पहिला 'जागतिक आदिवासी दिवस' घोषित करून साजरा करण्यात आला.

जागतिक स्तरावर आदिवासींना एकत्र आणणे, त्यांच्या मानवाधिकारांचे संरक्षण करणे, त्यांचे पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविणे, त्यांच्यावरील अन्याय-अत्याचार व त्यांचे होणारे शोषण थांबविणे, असे उद्देश हा दिवस साजरा करण्यामागे आहेत. म्हणजे साधारणत: गेल्या ३० वर्षांपासून हा दिवस जागतिक पातळीवर साजरा केला जातो आहे. आदिवासी समाजाच्या हजारो वर्षांच्या एकूणच इतिहासाच्या मानाने हा कालावधी खूपच कमी आहे.

आदिवासी समाज जगभरात त्या त्या देशांमध्ये विखुरलेल्या स्वरूपात राहतो म्हणून त्यांच्यात आतापर्यंत व्यापक पातळीवर संघटन घडून आलेले नाही. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी नागरी समूहांकडून त्यांचे खूप मोठ्या प्रमाणावर शोषण होत आलेले आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, कॅनडा व इतर अनेक ठिकाणी तर स्थलांतरित नागरी समूहांकडून त्यांचे अस्तित्वच संपवून टाकण्यात आलेले आहे. या पार्श्वभूमीवर हा दिवस जागतिक पातळीवर आदिवासींना एकत्र आणणारा दिवस आहे. त्यांच्या हक्कांविषयी नागरी समूहांत जाणीव निर्माण करणारा दिवस आहे. त्या दृष्टीने या दिवसाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

आदिवासी हा शब्द 'आदि' आणि 'वासी' या दोन शब्दांपासून तयार झालेला आहे. याचा अर्थ, आधीपासून किंवा आदिम कालखंडापासून वास करणारा समाज असा होतो. भारतात कुठेही पाहिले तरी हे आदिवासी बांधव बहुतांशी डोंगरदऱ्यांमध्ये राहतात. याला कारण काय? असा प्रश्न आदिवासी बांधवांना व इतरांनाही पडायला हवा व त्याचा शोध त्यांनी घ्यायला हवा, हे या दिनाच्या निमित्ताने मी सुचवू इच्छितो! परंतु काही विशिष्ट संघटना त्यांना 'वनवासी' असे संबोधतात. हा केवळ शब्दच्छल नसून त्यांचे आदिमत्त्व नाकारणारा खोडसाळपणा आहे. 'आदिवासी' या शब्दाला सांस्कृतिक व ऐतिहासिक संदर्भ आहेत. आदिमत्त्व हे त्यांचे एक महत्त्वाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. तर 'वनवासी' या शब्दाला फक्त 'भौगोलिक' संदर्भ आहे. म्हणून त्यांच्यासाठी 'आदिवासी' हाच शब्द वापरणे योग्य असून तो त्यांचे स्वतंत्र सांस्कृतिक अस्तित्व मान्य करणारा आहे.

भारतात ४२७ आदिवासी समूह आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील आदिवासी समाजाची लोकसंख्या १०.४३ कोटी होती, जी देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ८.६% होती. (२०२१ ची अधिकृत आकडेवारी उपलब्ध नाही.) याचाच अर्थ असा की, भारतात आदिवासींचे प्रमाण खूप मोठे असून हा समाज अगदी प्राचीन कालखंडापासून भारतात वास्तव्य करून आहे. भारतीय राज्यघटनेत त्यांचा 'अनुसूचित जमाती' (Scheduled Tribes-ST) असा उल्लेख करण्यात आलेला असून, त्यांचा या संवर्गात समावेश करण्यात आलेला आहे. त्यांना शिक्षण, नोकरी, राजकारण इत्यादी क्षेत्रांमध्ये प्रतिनिधित्व मिळावे यासाठी राखीव जागा म्हणजेच आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या विकासासाठी, त्यांच्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी, राज्यसंस्थेने प्रयत्न करावेत अशा मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश संविधानात करण्यात आलेला आहे. याच मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणीबाणीच्या काळात जेव्हा अंतर्गत सुरक्षेसाठी मूलभूत हक्कांचा संकोच करण्यात आला होता, त्याच काळापासून अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या विकासासाठी भारताच्या अंदाजपत्रकात स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात येत आहे. मात्र दरवर्षी अशा निधीची तरतूद करूनही तो निधी त्यांच्यासाठी पूर्णपणे खर्च न करता अनेकदा इतरत्र (लोकानुनय करणाऱ्या योजनांकडे) वळविला जातो.

भारतातील आदिवासी समाज हा सामाजिकदृष्ट्या मागासलेला आहे, असा अनेकांचा समज आहे. पण तो चुकीचा आहे. कारण भारतात सतीप्रथा, विधवा पुनर्विवाहास बंदी, हुंडा, जरठ-कुमारीविवाह, केशवपन, घटस्फोटास विरोध इत्यादी विवाहाशी व कुटुंबसंस्थेशी संबंधित अनेक अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी व सामाजिक सुधारणा करून चांगल्या प्रथा सुरू करण्यासाठी अनेक कायदे करावे लागले आहेत. त्यासाठी समाजसुधारकांना शे-दीडशे वर्षे आपली लेखणी व वाणीचा वापर करून मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी लागली आहे; संघर्ष करावा लागला आहे. भारतातील तथाकथित सामाजिकदृष्ट्या पुढारलेल्या समाजात अशा अनेक चुकीच्या प्रथा शेकडो वर्षे प्रचलित होत्या. आदिवासींमध्ये मात्र इतर समूहांसारख्या अशा दोषपूर्ण प्रथा, रूढी, परंपरा नव्हत्या. त्यांच्यात विधवा विवाह, पुनर्विवाह, घटस्फोट ज्याला काडीमोड म्हणतात, अशा प्रथा आधीपासूनच अस्तित्वात आहेत. जरठ-कुमारी

विवाह सहसा होतच नव्हते. हुंडा घेणे अथवा देणे, सतीप्रथा, केशवपन अशा तथाकथित उच्च नागरी समूहांतील क्रूर व अमानवी प्रथा आदिवासींमध्ये कधीच नव्हत्या. मग आता तुम्हीच सांगा की, सामाजिकदृष्ट्या कोण पुढारलेले आहे?

धार्मिक बाबतीत विचार करू जाता आदिवासी भागात मंदिरे आढळत नाहीत किंवा जी आढळतात ती अगदी अलीकडची आहेत. आदिवासींच्या अनेक प्रथा, परंपरा, देवी-देवता, सण-उत्सव, विवाहप्रथा, नृत्य, संगीत, लोकगीत, भाषा, वेशभूषा इत्यादी हे हिंदू अथवा इतर धर्मीयांपेक्षा वेगळे आहेत. त्यामुळे कागदोपत्री त्यांचा कोणत्याही धर्मात समावेश करण्यात येत असला तरी ते मूळतः निसर्गपूजक असून हा समाज निसर्गातील नद्या, डोंगर, वृक्ष, वनस्पती, प्राणी, गावाची वेस इत्यादींची पूजा करणारा आहे. या संदर्भात विकिपीडियात माहिती मिळते ती अशी - भारतात १८७१ साली पहिल्यांदा जनगणना झाली. त्यानंतर १९४१ पर्यंतच्या जनगणनेमध्ये आदिवासींचा समावेश हा हिंदू अथवा कोणत्याही धर्मात केला जात नव्हता. १९५१ च्या जनगणनेपासून मात्र त्यांचा हिंदू धर्मात समावेश करण्यात येऊ लागला. त्याआधी १८७१ मध्ये इतर धर्मीय (Other Religion), १८८१ मध्ये मूळ रहिवासी (Aboriginals), १८९१ मध्ये वन्य जमाती (Forest Tribes), १९०१ व १९११ मध्ये जैववादी (Animists), १९२१ मध्ये आदिम (Primitive), १९३१ मध्ये आदिवासी धर्म (Tribal Religion) तर १९४१ मध्ये फक्त आदिवासी (Tribe) अशा वेगवेगळ्या नावांनी त्यांचे वर्गीकरण करण्यात आलेले होते. हा संदर्भ लक्षात घेण्यासारखा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे हिंदू कोड बिल आणले, जे पुढे कायद्याच्या स्वरूपात अमलात आले ते ज्या जातिधर्मीयांना लागू आहे, त्यात कोणतेही आदिवासी समूह नाहीत. अर्थातच, आदिवासी हे हिंदू नाहीत असे स्पष्ट होते. अशाप्रकारे जगाच्या पाठीवरील कोणत्याही प्रचलित व प्रस्थापित धार्मिक गोंधळापासून, धार्मिक दोषांपासून, धार्मिक विद्वेषापासून अलिप्त राहिलेला, कोणत्याही संघटित धार्मिक आक्रमणाला बळी न पडलेला असा हा निधर्मी राहिलेला जनसमूह आहे. मात्र आज समाजसेवेच्या नावाखाली या समूहाला कोणत्या तरी संघटित धार्मिक कोंडवाड्यात कोंडण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यांच्यावर धार्मिक तसेच सांस्कृतिक अतिक्रमण होते आहे.

थोडक्यात, आदिवासी हे आदिम काळापासून त्या त्या देशात/ भूप्रदेशात वास करणारे असून नैसर्गिक जीवन, निसर्ग, आदिवासी संस्कृती, साधेपणा हाच त्यांचा प्राकृतिक धर्म आहे. त्यांची अतिशय प्राचीन, समृद्ध व स्वतंत्र अशी संस्कृती आहे, हे ध्यानात घेऊन तिची दखल घेणे गरजेचे आहे.

आज जागतिकीकरणाच्या, माहिती तंत्रज्ञानाच्या, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात आदिवासी समाजासमोर शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी, माहिती-तंत्रज्ञानाचा वाढता वापर, खाजगीकरणामुळे सरकारी नोकऱ्यांची घटती संख्या, इतर धर्मीयांच्या प्रभावामुळे, अनुकरणामुळे वाढत चाललेली कट्टरता, त्यामुळे मूळ आदिवासी संस्कृतीचा होत चाललेला ऱ्हास अशा समस्या आ वासून उभ्या आहेत. या समस्यांचा जाणकारांनी, विद्वानांनी अभ्यास करून मार्ग काढणे गरजेचे आहे.

तेव्हा या वर्षीच्या या जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने आदिवासी समाजाच्या बाबतीत असलेले गैरसमज दूर करून त्यांना माणूस म्हणून स्वीकारणे व आदिवासी समाजानेही अनेक बाबतीत आत्मचिंतन करणे व स्वत:वर होणाऱ्या अन्याय-अत्याचार-शोषण या संदर्भात जागरूकपणे आपली परंपरा आणि आधुनिकता यांची सांगड घालत, आपली पारंपरिक मूल्ये जपून कालानुरूप बदल स्वीकारत विचारपूर्वक भविष्यातील वाटचाल करणे गरजेचे आहे. यासाठी त्यांना प्रत्येक क्षेत्रात योग्य ते प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे.

सर्वांना जागतिक आदिवासी दिनाच्या सदिच्छा!

**(लेखक मराठी विषयाचे साहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.**

●


**महा. अंनिसच्या वेबसाइटला जरूर भेट द्या.**
**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे मार्च २०२५ पर्यंतचे अंक या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.**
**वेबसाईटची लिंक**
**https://www.mans.org.in**



# भाषाशिक्षण : समज, गैरसमज

प्रासंगिक

**संजय सोनवणी** । पुणे
मो. ७७२१८७०६६४

भाषा ही मानवी संस्कृतीच्या विकासाची आद्य खूण आहे. भाषांच्या जन्माबाबत प्रत्येक भाषकाची स्वत:ची पुराणकथात्मक सिद्धांतने अथवा (गैर) समज आहेत. तरीही मुळात मानवालाच भाषा अवगत आहेत का आणि त्या कशा जन्माला आल्या याबाबत जागतिक भाषातज्ज्ञ आजही संभ्रमात आहेत. भाषा ही संप्रेषणाचे एक मध्यम आहे. केवळ मानवालाच भाषेद्वारे विचारांचे, भावनांचे संप्रेषण करता येते असा समज हीच एक अंधश्रद्धा आहे. प्राण्यांची भाषा आपल्याला समजत नाही म्हणून त्यांना भाषाच अवगत नाहीत असे मानता येत नाही; हे मी माझ्या 'भाषांचा उगम' या पुस्तकात सिद्ध करून दाखवले आहे.

भाषांचा उद्‌गम ईश्वरापासून आहे, अशी प्राचीन काळी मान्यता होती. बहुतेक धर्मग्रंथांनी भाषेचे महत्त्व व त्या भाषेतून धर्मग्रंथांत मांडलेले जीवनावश्यक तत्त्वज्ञान ओळखून त्यावेळच्या ज्ञानाच्या मर्यादेमुळे भाषेच्या अद्भुत शक्तीला 'ईश्वराची निर्मिती' असा समज असल्यास नवल नाही. असे असले तरी जगात मग एवढ्या संख्येने भाषा का, हाही प्रश्न निर्माण झाला आणि माणसाने उत्तर शोधले तेही तत्कालीन धर्मकल्पनांतून. उदा. पृथ्वीतलावर पहिले संभाषण ॲडम व इव्हने केले व नोहाच्या नौकेच्या प्रवासाच्या अंतिम थांब्यानंतर 'टॉवर ऑफ बॅबेल' येथे नौकेतून उतरताना सर्व मानवांची भाषा एकच होती, असे बायबल (जेनेसिस ११.१-९) मानते. पुढे लोकसंख्या वाढली तरी माणसाने सर्व पृथ्वी व्यापण्याचा देवाचा आदेश मानला नाही. त्यामुळे देवानेच हस्तक्षेप करून भाषागट निर्माण केले. परिणामी, त्यानंतरच माणसाने पृथ्वी व्यापायला सुरुवात केली (इसाया ४५.१८). थोडक्यात, या मानवी गटांनी मूळच्याच कोणा एका भाषेला जगभर विविध रूपांत नेले असा हा बायबलचा दावा. ऋग्वेदाचा दावा आहे की, 'वाक्' नामक देवता भाषेची (वाणीची) निर्माती आहे आणि तिच्या साहचर्याने ऋषींना मंत्र स्फुरतात आणि ते ब्राह्मण (म्हणजे मंत्रकर्ते) बनतात (ऋ. १०.१२५). यामुळे वाक् या देवतेला अत्यंत गूढ, रहस्यमय व अद्‌भुत शक्ती मानले गेले. तिच्या अस्तित्वामुळे श्रवण, दृश्य, समज आणि भाषिक अभिव्यक्ती होत त्यांचे सत्य स्वरूप समजते अशीही कल्पना वैदिकांनी केली होती. थोडक्यात, भाषांची निर्मिती दैवी आहे हा समज मध्ययुगापर्यंत प्रचलित होता.

भाषांविषयीची शास्त्रीय चर्चा सुरू झाली ती प्रबोधन काळात. भाषांचा उदय कसा झाला असावा व त्यांच्या आजपर्यंतच्या प्रगतीचे टप्पे कोणते असावेत याबाबत सतराव्या शतकापासूनच तत्त्वज्ञांपासून तर भाषाकोविदांपर्यंतचे जाणकार चर्चा करू लागले होते. त्यांच्यात एकमत न होता विवादच वाढू लागल्यानंतर १८६६ मध्ये 'लिंग्विस्टिक सोसायटी ऑफ पॅरिस'ने या विवादावरच बंदी घालण्याइतपत मजल गाठली होती. आजही हिंदीच्या रूपाने भाषांचा विवाद टोकाला जाताना आपण पाहतो. हिंदी लादणे म्हणजे उत्तर भारतीय संस्कृती दक्षिण भारतावर लादण्याचा प्रयत्न आहे; ही वस्तुस्थिती आहे. कारण हा उपद्‌व्याप नवा नाही. त्याच वेळेस 'संस्कृत भाषाच आधीची असून ती देववाणी असल्याने तिच्यापासून सर्व भाषा निर्माण झाल्या', असे अशास्त्रीय मतही हिरिरीने प्रचारित केले जाते, तेही आर्य अथवा वैदिक वर्चस्ववादाच्या भावनेपोटीच! थोडक्यात, भाषांचे कुतूहल मुळात वर्चस्ववादी भावनांतूनच जन्माला आले आहे आणि त्यामुळेच भाषांचा प्रश्न सहजी सुटेल असे दिसत नाही.

भाषांबाबत एवढ्या अंधश्रद्धा आहेत की, त्या अन्य कोणत्याही अंधश्रद्धांपेक्षाही भयंकर आहेत हे सहसा आमच्या लक्षात येत नाही. आधुनिक भाषातज्ज्ञही या अंधश्रद्धा नुसत्या जोपासत नाहीत, तर त्यांना खतपाणी घालण्याकडेच अधिक लक्ष देतात. अलीकडेच महाराष्ट्र सरकारने त्रिभाषिक सूत्र लादून मुलांना पहिलीपासून तीन भाषा शिकवायचे धोरण आणले व त्यात हिंदी भाषेचा समावेश केला होता. मुले लहान वयातच अधिक भाषा शिकू शकतात हे गृहीतकच अद्याप सिद्ध झालेले नाही. तरीही त्याआधारे त्रिभाषा सूत्राचे समर्थन करण्यात

विशिष्ट वर्ग दंग झाला आहे. पण हे 'क्रिटिकल पिरियड हायपोथेसिस' हे केवळ भाषाच नव्हे, तर अन्य क्षेत्रातही लागू पडते आणि भाषा हे त्यातील केवळ एक साधन आहे, हे सोयीस्कररीत्या विसरले जाते. मुले अनेक भाषा शिकू शकतात तर मग हिंदी, इंग्रजीच का? तेलुगु, तमिळ, चीनी, पोर्तुगीज भाषा का नको? तीनच भाषा का? मग पाच किंवा दहा भाषा का नको हा प्रश्न कोणी धडपणे विचारला नाही आणि त्याचे उत्तरही असू शकत नाही.

बालवयात अनेक भाषा शिकण्याचे समर्थन करणारे हेच लोक याच सिद्धांताला खोडून काढणाऱ्या आणि जगाने पारखून घेतलेल्या सिद्धांताकडे मात्र दुर्लक्ष करतात. हा सिद्धांत सांगतो की, मुलांच्या आकलन, अभिव्यक्ती आणि तुलनात्मक विचारबुद्धीच्या विकासासाठी त्यांना मातृभाषेतूनच शिकविणे हे अत्यंत आवश्यक आहे. मुले मातृभाषा लहानपणापासून ऐकतात आणि बोलतात, त्यामुळे ती त्यांच्या मेंदूसाठी सर्वात परिचित आणि नैसर्गिक माध्यम असते. मातृभाषेत शिक्षण घेतल्याने मुलांना संकल्पना समजणे, विचार करणे आणि व्यक्त करणे सोपे जाते. उदा. UNESCO, २००३; Cummins, २००० मधील संशोधन दर्शवते की, मातृभाषेत शिक्षण घेतल्याने मुलांचा संज्ञानात्मक विकास (Cognitive Development) जलद आणि प्रभावी होतो; कारण त्यांना नवीन संकल्पना शिकण्यासाठी (अन्य भाषेतून शिक्षण घेतांना होतो तसा) भाषेच्या अडथळ्याचा सामना करावा लागत नाही. शिवाय जेव्हा मुले मातृभाषेत शिकतात, तेव्हा त्यांना विषय समजण्यासाठी कमी वेळ लागतो आणि ते अधिक आत्मविश्वासाने शिकतात. यामुळे त्यांचे शैक्षणिक यश सुधारते. उदाहरणार्थ, दक्षिण आफ्रिकेतील एका अभ्यासात (Heugh, २००६) असे दिसून आले की, मातृभाषेत प्राथमिक शिक्षण घेतलेल्या मुलांनी गणित आणि विज्ञान विषयांत परदेशी भाषेत शिक्षण घेतलेल्या मुलांपेक्षा अधिक चांगली कामगिरी केली.

हे येथेच मर्यादित राहत नाही. मातृभाषेतील शिक्षणामुळे मुलांना त्यांच्या संस्कृतीशी आणि भाषिक वारशाशी जोडलेले राहता येते. यामुळे त्यांचा आत्मसन्मान आणि सांस्कृतिक ओळख कायम ठेवण्यास मदत होते. तसेच स्थानिक भाषा आणि संस्कृतींचे जतन होते जे जागतिकीकरणाच्या युगात विशेष महत्त्वाचे आहे.

कोणत्याही विद्यार्थ्याच्या मातृभाषेतून बोलणे, वाचणे, लिहिणे अशा क्षमतांचा पाया पक्का असेल, तर त्याची दुसरी भाषा शिकण्याची क्षमता सहजतेने वाढते. मातृभाषेचा असा मजबूत पाया तयार झाल्यास मुले दुसऱ्या भाषा (जसे इंग्रजी, हिंदी) अधिक सहजतेने आणि प्रभावीपणे शिकू शकतात. याला 'भाषिक परस्परावलंबन' असे म्हणतात (Cummins, १९७९). मातृभाषेवरील चांगले प्रभुत्व दुसऱ्या भाषेवरही प्रभुत्व मिळवण्यास साहाय्यक ठरू शकते. आता या सिद्ध झालेल्या तत्त्वाचा - सिद्धांताचा अवलंब करण्याऐवजी केवळ भाषिक व सांस्कृतिक वर्चस्व निर्माण करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या या निर्णयाला कसे स्वीकारता येईल? म्हणजेच पहिलीपासून तीन भाषा शिकणे सक्तीचे करणे, हा निर्णय अशास्त्रीय आहे. अशाप्रकारे पहिलीपासून तीन भाषा शिकवणे हे मुलांचे बौद्धिक अध:पतन घडवण्यास कारण ठरणार आहे.

मुळात कोणतीही भाषा ही त्या त्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या सामूहिक मानसशास्त्राची उपज असते. त्यामुळे भाषेचेही एक पर्यावरण आपसूक तयार होते. भाषा देव बनवत नसतात तर आपला भूगोल बनवत असतो. जेथील प्रदेशाची भूशास्त्रीय वैशिष्ट्ये वेगळी, तेथील भाषा वेगळी, म्हणूनच जगात आजमितीला ६८०९ भाषा आहेत. दुसऱ्या प्रदेशातील भाषिक पर्यावरणच वेगळे असल्याने त्या भाषा येथील भाषिक पर्यावरणात उपऱ्या ठरतात. त्या भाषेतील शब्द स्वीकारले तरी त्यात स्वानुकुल उच्चार व व्याकरणीय बदल करून घेतले जातात. कारण प्रत्येक भाषेची भाषिक प्रवृत्ती वेगळी असते.

जगातील एखादी भाषा श्रेष्ठ आहे असे म्हणता येईल अशीही स्थिती नाही. सर्वच भाषा बरोबरीच्या आहेत. इंग्रजी ज्ञानभाषा झाली. कारण तिने जगभरचे वाङ्मय आपल्या भाषेत आणले. त्याला त्यांचे अर्ध्या जगावरील राज्यही कारणीभूत होते. पण असे असले तरी, खुद्द इंग्रजीतही अनेक भाषाभेद झाले. आफ्रिकन, अमेरिकन, इंडियन, लॅटिन अमेरिकन, व्हल्गार असे इंग्रजीचेच अनेक उपप्रकार पडले, ते त्या त्या भागातील भूशास्त्रीय वेगळेपणात इंग्रजी भाषा लोकांनी आपल्या सामूहिक मानसशास्त्राने घडवली. हे सामूहिक मानसशास्त्र कोणाचीही पाठ सोडत नाही. भाषिक पर्यावरण आणि भाषिक मानसशास्त्र हे निसर्गत: आपल्याशी जोडले गेलेले आहेत. त्यामुळेच महाराष्ट्रातही समान भूशास्त्रीय

स्थितीत जेथे किरकोळ बदल आहेत तेथे तेथे प्रदेशनिहाय बोलीभाषा निर्माण झालेल्या आहेत. पण एकूणातील मराठीची प्रवृत्ती एकच आहे.

अन्य भाषांतील ज्ञान स्वभाषेत आणायला आम्हाला कोणी रोखले आहे? पण भाषिक गुलामीची सवय लागलेले वा ती लादू पाहणारे हा विचार करीत नाहीत, हेही दुर्दैवी आहे. मराठीलाच ज्ञानभाषा करण्यासाठी सरकारने असे काही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. पण वर्चस्ववादी समुदायांना भाषिक अंधश्रद्धा निर्माण करणे सोयीचे जात असते. पूर्वीचे आणि सध्याचे हिंदुत्ववादी (वैदिकवादी) सरकार आधी संस्कृतलाच राष्ट्रभाषा करायला पुढे सरसावले होते. कारण ती म्हणे सर्वात प्राचीन भाषा आणि तिच्यातूनच अन्य भाषा जन्माला आल्या. हा भाषिक दहशतवाद भारतीयांचा आत्मसन्मान हिरावून घेण्यास कारण झाला आहे.

खरे तर संस्कृत ही नैसर्गिक भाषा नाही. प्राचीन तर नाहीच नाही. त्यामुळेच या भाषेला कोणतेही प्रादेशिक संदर्भ नाहीत जसे अन्य नैसर्गिक भाषांना आहेत. जसे गुजराती, तेलुगु किंवा मराठी अशा भाषांना त्या त्या भाषेच्या भूगोलातून नाव आलेले आहे तसे संस्कृत (आणि हिंदी) भाषेचे नाही. संस्कृत आणि हिंदी या भाषांना ना प्रदेशनामाचा संदर्भ आहे, ना कोणत्या समूहनामाचा. या भाषा अन्य भाषांतून उसनवारी करून निर्माण केल्या गेलेल्या कृत्रिम आणि अगदी अर्वाचीन भाषा आहेत. हिंदी भाषा अठराव्या शतकात मुख्यत: खडी बोली, ब्रज, भोजपुरी वगैरे भाषांतील शब्द आणि संस्कृतचे व्याकरण घेऊन सिद्ध झाली. भाजप सरकारला संस्कृत आणि हिंदीचे एवढे आकर्षण का? की त्यांना मुळात कृत्रिमतेचा सोस आहे म्हणून असे अशास्त्रीय निर्णय लादण्याचे प्रयत्न होतात?

मुळात शिक्षण या संकल्पनेचा उपयोग सांस्कृतिक वर्चस्वाच्या कारणांसाठी केला जातो आणि त्यासाठी भाषा हे तर फारच सोयीचे साधन ठरते. जगभर असेच होत आलेले आहे. आर्यभाषा गट सिद्धांतही एकोणविसाव्या शतकात आणला गेला तो युरोपियन लोकांचे भाषिक वर्चस्व सिद्ध करण्यासाठी, हे आज सारे जाणतात. त्याचाच आधार घेत येथील स्वत:ला 'आर्य' समजणाऱ्या वैदिक लोकांनी संस्कृत हीच सर्व भाषांची जननी असे मानायला सुरुवात केली. पण हे होत असताना अवघे जग याच अंधश्रद्धेने लडबडलेले होते, हा तर अगदी अलीकडचा इतिहास आहे.

खरे तर, संवादाची उपजत नैसर्गिक निकड, हेच तत्त्व मानवी भाषिक क्षमतेला विकसित करणारे कारण झाले. त्याला जोड मिळाली ती एका नैसर्गिक वैशिष्ट्याची आणि ते म्हणजे त्याला विविध व गुंतागुंतीचे आवाज काढता येतील असे स्वरयंत्र लाभलेले आहे. त्यामुळेच तो विविध ध्वनींना क्रम देत प्राथमिक शब्द बनवू शकला. जसे त्याचे विश्व विस्तारत गेले तसे त्याचे बदलत्या स्थितीमुळे भाषाविश्वही समृद्ध होत गेले. जेथे जीवन कमी गुंतागुंतीचे होते तेथील भाषांचा विकास हा त्यांच्या गरजेपुरताच मर्यादित राहिला.

या निकडीची तीव्रता जेवढी अधिक तेवढीच भाषेची विकसनशीलताही अधिक. याचाच अर्थ असा की, भाषा या मानवजातीच्या निर्मितीकाळापासून जन्माला आलेल्या आहेत. इंडो-युरोपियन भाषागट सिद्धांत सांगतो त्याप्रमाणे तो फक्त पाच-सहा हजार वर्ष जुना नाही. तसे मानणे हीच फार मोठी भाषिक अंधश्रद्धा आहे. खरे तर, साधारणपणे एकाच कोणत्यातरी आदिम काळात वेगवेगळ्या प्रदेशात राहणाऱ्या माणसांच्या तोंडून निघणाऱ्या शब्दाला त्या प्रादेशिक मानसिकतेच्या लोकांनी सामूहिक अर्थ दिला, जतन केला, तेथेच भाषेचा जन्म झाला. भाषा ही माणसाची सामूहिक निर्मिती आहे. त्यामुळेच एका भागात राहणाऱ्या लोकांना तेथील भाषा समजते, संवाद करता येतो. अन्य भाषा प्रयत्नाने शिकाव्या लागतात. कारण त्या आपल्या भाषिक पर्यावरणाला साजेशा नसतात. पण स्वभाषेचे ज्ञान मात्र समान पर्यावरणामुळे सहज प्राप्त होते, त्या सहज शिकल्या जातात आणि शब्द-व्याकरणही समृद्ध होत जाते. प्रमुख जनसमूहांपासून अलग राहणाऱ्या लोकांची भाषा मात्र तेवढी विकसित होत नाही. कारण त्यांचे जीवनही तेवढे गुंतागुंतीचे नसते. कोणातरी एखाद्या मानवी गटाने श्रेष्ठ भाषा निर्माण केली आणि ती इतरांवर लादली, ही मते आता कालबाह्य झाली आहेत. या मतांमागे केवळ वर्चस्वतावादी भावना होत्या. भाषा या जागतिक सामूहिक मानसिकतेतून व आपापल्या प्रादेशिक भूशास्त्रीय प्रभावातील वैशिष्ट्यपूर्ण मानसिकतेतून निर्माण झाल्या आहेत. म्हणून जगात भाषांचे प्रमाणही मोठे आहे.

कोणत्याही भाषेचा अभिमान असणे आणि भाषाश्रेष्ठत्वाचा अहंकार बाळगणे यात फार मोठा फरक

आहे. भाषा हे मानवी संस्कृतीचे संचित असल्याने त्याबद्दल अभिमान बाळगणे स्वाभाविक आहे. पण भाषेचा अहंकार बाळगत अमुक एकच भाषा श्रेष्ठ मानणे आणि ती इतरांवर लादणे हे अमानवीय आहे. भाषा हे संवादाचे, अभिव्यक्तीचे मोलाचे साधन आहे आणि भाषेमुळेच आपण 'माणूस' ठरतो हे विसरता कामा नये. त्यामुळे मातृभाषा हेच शिक्षणाचे मध्यम असले पाहिजे. परभाषा नंतर स्वत:च्या आवडीने शिकता येऊ शकतात. उलट स्वत:ची भाषा पक्की असेल तर नवी भाषा शिकणे सोपे जाते.

म्हणूनच हिंदी, संस्कृतच काय पण इंग्रजी भाषाही सहावीपासून शिकवली गेली पाहिजे. द्विभाषा किंवा त्रिभाषा सूत्र आणण्यापेक्षा एक भाषा सूत्र आणि तेही 'मातृभाषा सूत्र' आणले गेले पाहिजे. हीच आपली मागणी असली पाहिजे. भावी पिढ्या सशक्त बुद्धीच्या व्हायच्या असतील तर भाषांबाबतच्या अंधश्रद्धेतून प्रथम बाहेर पडले पाहिजे.

**(लेखक बहुविध विषयांचे व्यासंगी असून त्यांची अनेक विषयांवरील पुस्तके प्रकाशित झाली आहेत.)**

•

## पिकांना मंत्र ऐकवणारे छद्मविज्ञान

'शेतातील पिकांना श्री सूक्तातील मंत्र ऐकवल्याने सोयाबीनच्या उत्पादनात वाढ होते'. महाराष्ट्राच्या जडणघडणीत, देशाच्या कृषी क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देणारे डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने असलेल्या कृषी विद्यापीठाच्या मंचावर, ज्यांनी महाराष्ट्रात हरितक्रांती घडवून आणली त्या माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईकांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या 'प्रयोगशील शेतकरी पुरस्कार' वितरणप्रसंगी कांचन गडकरी यांनी हे विधान केले. अशा पुरोगामी स्वरूपाच्या कार्यक्रमातही प्रतिगामी प्रवृत्तींनी छद्मविज्ञान पुढे रेटण्याचा केलेला हा प्रयत्न अश्लाघ्य आहे.

भारतातील हरितक्रांतीचे प्रणेते डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांनी वैज्ञानिक प्रयोगशीलतेतूनच देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले. त्यामुळेच देशाची गरज भागवून आज भारत अन्नधान्य निर्यात देखील करतो. जर स्वामिनाथन हे श्रीमती गडकरी यांच्या विधानानुसार छद्मविज्ञानाचे प्रयोग करीत बसले असते तर आज भारतीयांवर उपासमारीचीच वेळ आली असती.

कोणताही वैज्ञानिक सिद्धांत निरीक्षण, तर्क, अनुमान, प्रयोग आणि त्याची सार्वत्रिक प्रचिती या टप्प्यांतून सिद्ध होत असतो. 'मंत्र ऐकवल्याने सोयाबीनच्या उत्पादनात वाढ होते' असे ठाम विधान श्रीमती गडकरी यांनी कोणत्या प्रयोगांच्या आधारावर केले त्या प्रयोगांचे निष्कर्ष कोणत्या विज्ञान नियतकालिकात प्रसिद्ध केल्याचे ऐकिवात नाही.

वनस्पतींना कान असतात का? आवाजाचे आकलन करण्याच्या क्षमतेची त्यांची मज्जासंस्था विकसित झालेली असते का? मानवाच्याच बाबतीत म्हटले तरी श्रीमती गडकरी यांनी सुचविलेल्या मंत्रांची भाषा, त्यांचा अर्थ न समजणाऱ्या लोकांचीच संख्या मोठी आहे. विकसित मज्जासंस्था लाभलेल्या मानवालाच या मंत्रांचे आकलन होत नसेल तर भाषा आणि त्यातील अर्थाच्या आकलनाची दुरान्वयानेही क्षमता नसणाऱ्या वनस्पतींना ते मंत्र कसे समजतील? आणि त्यांच्या उत्पादनात वाढ होईल ही शक्यता तर अजिबातच नाही.

एकीकडे खऱ्या अर्थाने प्रयोगशील शेतकरी असलेल्या बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे या महिलेला राष्ट्रीय विज्ञान परिषदेत बोलतांना रोखले गेले होते तर दुसरीकडे कृषी विद्यापीठाच्या वैज्ञानिक मंचावरून राजकीय व्यक्तीशी संबंधित असलेल्या महिलेला छद्मविज्ञानाचा पुरस्कार करण्यासाठी अवैज्ञानिक विधाने करण्याची, अंधश्रद्धा पसरविण्याची मोकळीक मिळते; ही बाब अत्यंत निषेधार्ह आहे.



# राष्ट्र आणि राष्ट्रवाद

**सलीम मोमीन ।** सांगली
मो. ९८६००५५१७५

राष्ट्र आणि राष्ट्रवाद या संकल्पना अगदी अर्वाचीन आहेत. राष्ट्रवाद ही पाश्चात्त्य संकल्पना आहे. एका भूप्रदेशावर, त्या सीमांत असलेल्या समूहाच्या, आपल्या समूहहिताच्या प्रेरणा यातून राष्ट्रवादाची संकल्पना उदयास येते आणि बळकट होत जाते. समूहाच्या सामूहिक प्रेरणांमधून त्या समूहाने आपल्या भूमीवर केलेल्या उदात्त प्रेमाची प्रेरणा म्हणजे राष्ट्र. राष्ट्र म्हणजे आपल्या मालमत्तेची, आपल्या वारशाची, संस्कृती, इतिहास, भाषा आणि समूहमूल्यांचा, सांस्कृतिक मूल्यांचा आदरभाव. अनेक वैचारिक समूहांचा अंतर्भाव. राष्ट्रांतर्गत होणाऱ्या घटनांना त्या देशाच्या अंतर्गत असलेल्या समूहाने, समूहांच्या भावनांचा आदर करावा अशा विचारांनी राष्ट्रभावना प्रेरित होते. यात राष्ट्रातील संपूर्ण समूह एकाच रंगाने रंगलेला असतो. मात्र राष्ट्राच्या आणि त्यातून अनुस्यूत होणाऱ्या राष्ट्रवादाच्या या सर्व संकल्पना पाश्चात्त्य भूमीत विकसित झाल्या आहेत. भारतात राष्ट्र म्हणून जी भावना उदयास आली तीच ब्रिटिशांची सत्ता भारतात स्थिरावल्यानंतरच. त्यानंतर ती स्वातंत्र्य चळवळीत दृढ होत गेली. तरीही भारतीयत्व हेच राष्ट्रीयत्व राहिले आहे. आणि भारताचा हा राष्ट्रवाद पाश्चात्त्य राष्ट्रवादाच्या संकल्पनेपेक्षा पूर्णतया वेगळा आहे.

काही तज्ज्ञांची, विचारवंतांची राष्ट्रविषयक मते पाहू या. काही आंतरराष्ट्रीय विचारवंतांची मते अशी –

**बॅनेडिक्ट अँडरसन :** राष्ट्र ही काल्पनिक पण वास्तव सामाजिक संकल्पना आहे.

**अर्नेस्ट गेलनर :** राष्ट्रवाद म्हणजे राष्ट्र तयार करणारी प्रेरणा.

**मॅक्स वेबर :** राष्ट्र म्हणजे राज्यसंस्थेच्या निर्मितीची इच्छा असलेला समुदाय.

**काही भारतीय विचारवंतांची मते अशी –**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर :** राष्ट्रभक्ती म्हणजे समान इतिहास व आकांक्षांवर आधारित सामाजिक भावना.

**पंडित नेहरू :** देश म्हणजे सांस्कृतिक व भौगोलिक एकता.

**डॉ. लोहिया:** राष्ट्रवाद लोकशाही व समतेशी जोडलेला असावा.

भारतीय संविधानातील उद्देशिकेतून राष्ट्रभावना स्पष्ट होते – ‘आम्ही भारताचे लोक’ हे वाक्यच भारतीय ‘राष्ट्र’ संकल्पनेचा आधार आहे.

आपण एका सार्वभौम प्रजासत्ताकातील संविधानिक नागरिक आहोत. आपला देश, आपले राष्ट्र विविधतेने नटलेले आहे. भारतीय भौगोलिक प्रदेशातील एका देशाच्या संकल्पनेत अनेकविध भाषा, परंपरा, आणि भौगोलिक रचना यांना अनुसरून राष्ट्र, प्रांतवजा राष्ट्र ही संकल्पना आहे. या संकल्पनेनुसार राज्यांच्या भाषिक, सांस्कृतिक, वांशिक प्रांतरचना झाल्या आहेत. या भौगोलिक-सांस्कृतिक राज्यांची रचना धर्मानुसार न करता, तेथील भाषा व सांस्कृतिक मूल्यांचा विचार करून राजकीय संकल्पना निर्माण झाल्या आहेत. अनेक राज्यांतील विविधतेतून एकतेची भावना स्वीकारतांना एक देश ही भावना आपण आत्मसात करू शकलो, हेच आपल्या देशाचे वैशिष्ट्य आहे.

अशाप्रकारे पाश्चात्त्य राष्ट्रवादापेक्षा भारतीय राष्ट्रवाद हा वेगळा आहे. पाश्चात्त्य राष्ट्रवाद एकच भाषा, प्रथा, परंपरा, वंश, संस्कृती यांचा आग्रह धरतो तर भारतीय राष्ट्रवाद विविधतांमध्ये एकता निर्माण करून त्यात एकोपा राखतो, परंतु एकसारखेपणाचा त्यात आग्रह नाही. त्यामुळेच भारताचे राष्ट्रीयत्व हे केवळ भारतीयत्व हेच असून ते जगाच्या संशोधनाचा विषय राहिले आहे.

काही धार्मिक संघटनांचा हेतू किंवा त्यांची राष्ट्रीयत्वाची व्याख्या धर्मानुषंगाने मांडण्यात येते, आणि ती लादण्याचा प्रयत्न केला जातो; जी तथ्यहीन आहे, वास्तवाला धरून नाही. कारण देशाच्या फाळणीनंतर ज्या व्यक्तींनी, ज्या समूहांनी धर्मापेक्षा आपल्या मातृभूमीला प्राधान्य दिले, त्यांच्या राष्ट्रीय भावनेवर संकुचिततेचा आरोप करण्याचा किंवा त्यांना परके म्हणून अवहेलना करण्याचा प्रयत्न काही सांस्कृतिक म्हणवल्या जाणाऱ्या संघटना व त्यांचे राजकीय पक्ष सातत्याने करीत आले आहेत. अशा संघटना धार्मिक भेदभाव वाढविणे, इतरांच्या सांस्कृतिक मूल्यांचा तिरस्कार करणे, वेगवेगळ्या धार्मिक समूहांमध्ये तेढ निर्माण करणे यासाठी आपली शक्ती वापरत असतात. या गोष्टी देशाला कमकुवत करणाऱ्या असून खेदाची गोष्ट अशी की, अलीकडे या शक्ती प्रबळ होत असल्याचे दिसून येते.

देशभावनेमध्ये मानवी मूल्यांचा आदर करणे महत्त्वाचे आहे. देश म्हणजे फक्त सीमांत, नागरिकत्व एवढीच भावना नसते. देश म्हणजे देशातील नैसर्गिक साधनसंपत्ती व

संसाधने, सांस्कृतिक ठेवा जपणे, देशप्रेमाच्या (देशबांधवांच्या) विचारांना प्रेरित करणे, देशहितासाठी कोणत्याही प्रकारचा त्याग करणे आणि त्यासाठी त्या भावना व्यक्त करणे. देश म्हणजे एक नैसर्गिक मानवी मूल्यांच्या, समूहाच्या विचारांचा भाग असतो.

आपण एका धर्मनिरपेक्ष देशाचे विविध धर्मीय नागरिक आहोत. त्यातही धर्म स्वीकारणे किंवा नाकारणे हाही नागरिकाचा व्यक्तिगत अधिकार आहे. कोणत्याही धार्मिक मान्यता किंवा धर्मसंहिता या देशाच्या संविधानापेक्षा प्रबळ मानता येत नाहीत. 'प्रथम देश' ही संकल्पना आपण बाळगतो, त्यानंतर धर्म ही संकल्पना ऐच्छिक आहे, ती दुय्यम समजली जाते. या देशाच्या भौगोलिक क्षेत्रातील समूहाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्यांना आपण स्वातंत्र्ययोद्धे म्हणतो. देशप्रेमाची ऊर्जा ती तुमच्या जगण्यात, विचारांत अंतर्भूत असावी लागते. राष्ट्रवादाची भावना ही काही सामूहिक हेतूंची, काही सामूहिक विचारांची वाहक असते. तरीही राष्ट्रवादाची भावना नागरिक या संकल्पनेला छेद देऊ शकत नाही. नागरिकांचे मुलभूत अधिकार राष्ट्रवाद हिरावून घेऊ शकत नाही.

मुळात राष्ट्रवादाच्या संकल्पनेपेक्षा समूहातील 'राष्ट्रभावना' अधिक महत्त्वाची असते. या शब्दावर भर का नसावा हा प्रश्न विचारायला हवा. कारण देशाच्या इतिहासात कोणत्याही हिताला, कोणत्याही कार्याला प्रेरक असते ती केवळ राष्ट्रभावनाच. भारतासारख्या विविध धार्मिक मतप्रवाह असलेल्या देशात धर्मनिरपेक्षता हे मूल्य खूप महत्त्वाचे आहे. धर्मनिरपेक्षता काही व्यक्तिगत मूल्य नसून ते देशाच्या राज्यकारभारातील महत्त्वाचे मूल्य असून अनेकदा त्याचा अर्थ सर्वधर्मसमभाव असा घेतला जातो. परंतु ते तसे नसून देशाचा शासनव्यवहार हा कोणत्याही एका किंवा अनेक धर्माच्या तत्त्वांनुसार चालणार नसून तो केवळ इहवादी दृष्टीकोनातून चालविला जाईल, असा अर्थ त्यात अभिप्रेत आहे. त्याचवेळी देशातील लोक मात्र आपापल्या धर्माचे पालन करू शकतात. म्हणून संविधानातले 'आम्ही भारताचे लोक' हे एकच वाक्य आपल्या देशभावनेला धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे स्वरूप देते. 'आम्ही भारताचे लोक' म्हणजे संविधानिक घटनाबद्ध प्रांतांतील देशाचे नागरिक आहोत, ही भावना नागरिकांच्या देशभक्तीला एक अधिकार देते. 'आम्ही भारताचे लोक' या शब्दांमधूनच सर्व धर्म, जाती, समूह आणि तसेच सर्व धार्मिक मान्यता नाकारणाऱ्या वर्गांनाही भारतीय नागरिकत्वाचे हक्क आणि अधिकार बहाल करण्यात आले आहेत. जगातील एका मोठ्या लोकशाही देशाचे आपण नागरिक आहोत. आपल्या हजारो वर्षांच्या इतिहासात अनेक आक्रमणे आली, परंतु आपली संस्कृती, मूल्ये, आदर्श आजही टिकून आहेत.

१९२० ते ३० दरम्यान राष्ट्र आणि राष्ट्रवाद या संकल्पनांनी जोर धरला आणि तो राष्ट्रवाद हा राष्ट्रभावना, स्वातंत्र्य, हक्क, दर्जा आणि मूलभूत अधिकारांची मागणी, भौगोलिक सीमांतावर आधारित होता. परंतु धर्मभावनेपेक्षा काही समूह, प्रांतिक, सामाजिक एकोप्याने, बंधुत्वाने प्रेरित झालेले होते. अशा राष्ट्रभावनेने प्रेरित झालेल्या राष्ट्रवादांनी आशिया व आफ्रिका खंडातील देशांना त्यांच्या स्वातंत्र्य चळवळीत मोठे योगदान दिलेले आहे.

मात्र त्याचवेळी धर्मभावनेने प्रेरित झालेल्या काही भारतीय संघटनांनी स्वातंत्र्यलढ्याला हातभार लावला नाही, हे येथे स्पष्ट करणे आवश्यक आहे. कारण त्यांचा राष्ट्रवाद धर्माधारित होता. तो त्यावेळीही 'आम्ही भारताचे लोक' या सर्वसमावेशक भारतीयत्वाच्या व्याख्येत बसणारा नव्हता; आणि आजही नाही.

**राष्ट्रवादाच्या काही संकल्पना:**

१. धार्मिक मान्यतेचा राष्ट्रवाद

२. भाषिक-प्रांतीय राष्ट्रवाद

३. लोकसमूह, सर्वधर्मीय, धर्मनिरपेक्ष मान्यतेचा राष्ट्रवाद

४. खंडात्मक विचारसरणीचा राष्ट्रवाद

- **धार्मिक मान्यतेचा राष्ट्रवाद :** हा धार्मिक मान्यता प्रबळ करणारा, परंतु वेगवेगळ्या भौगोलिक रचनेसह मान्यता असणारा राष्ट्रवाद असतो.
- **भाषिक प्रांतीय राष्ट्रवाद:** याचे चांगले उदाहरण बांगलादेश आहे. भाषेच्या मुद्द्यावरून देशाची मागणी झाली आणि तो एक वेगळा देश निर्माण झाला.
- **लोकसमूहावर आधारित धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद :** समूह कोणत्याही धर्मांचे असोत, धार्मिक असोत वा नास्तिक, राष्ट्रवादाची भावना धर्मनिरपेक्ष असते.
- **खंडात्मक राष्ट्रवाद :** याला राष्ट्रवाद म्हणण्यापेक्षा, समूहराष्ट्र संकल्पना म्हणणे योग्य राहील. या संकल्पनेनुसार युरोप खंडातील राष्ट्रांमध्ये अजूनही एकसंधतेचा प्रयत्न चालू आहे; त्यांचे एक राष्ट्र बनविण्याचे प्रयत्न चालू आहेत.

भारतीय संविधानात राष्ट्रवादाची संकल्पना स्पष्ट आहे. राज्यघटनेत सामाजिक मूल्ये, नैतिकता, धार्मिक मान्यता, प्रेरणा आणि सांस्कृतिक मूल्यांना मानवतावादी आणि कायदेशीर आधार दिला आहे. संविधानिक, सार्वभौम, लोकशाही राष्ट्र म्हणून आपण या राष्ट्रभावना स्वीकारलेल्या आहेत.

●

# 'जोविनि': विवेकी समाजाच्या दिशेने एक पाऊल



**रेश्मा खाडे ।** कोल्हापूर
मो.९४२१११४८७९

आयुष्याच्या जोडीदाराची निवड करायची म्हटले की, त्याची सुरुवात कांदापोहे, चहा आणि मुलगी/मुलगा पाहणे या पारंपरिक पद्धतीने होत आलेली आहे. आयुष्यभराच्या सहजीवनाचा इतका मोठा निर्णय इतक्या सहजगत्या त्या जुजबी 'पाहण्या'तून घेतला जातो. अनेकांना वाटेल की, मग 'जोडीदाराची विवेकी निवड' (जोविनि) ही कोणती नवीन पद्धती आहे?

'जोडीदाराची विवेकी निवड' हा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. तरुणांना प्रेम, मैत्री, आकर्षण आणि जोडीदार निवडीसाठी विवेकी दृष्टी देत नात्यातील सुरेल संवादासाठी तरुणाईला आणि पालकांना समुपदेशनाचे काम हा विभाग करतो. डॉ. नरेंद्र दाभोलकर म्हणायचे, 'हा उपक्रम येत्या दशकातील महत्त्वाचा उपक्रम ठरणार आहे.' तरुणाईसाठी हा जिव्हाळ्याचा विषय असल्याने त्यांना आकर्षित करणारा आहे. तरीही त्यांना याविषयी बोलण्याची संधी, मोकळेपणा मात्र आपल्या समाजात फारसा आढळत नाही. त्यामुळे या विषयाची सामाजिक गरज डॉ. दाभोलकरांनी दूरदृष्टीने हेरली होती. सुरुवातीला त्यांनी लातूर आणि कोल्हापूर येथे दोन दिवसांचे 'जोडीदाराची विवेकी निवड' या विषयावर युवा संवाद कार्यक्रम घेतले होते. त्यातून पुढे या उपक्रमाची सुरुवात झाली. तशी २०१५ पासूनच आरती नाईक, सचिन थिटे, महेंद्र नाईक, तुषार शिंदे, निशा फडतरे अशा काही युवा कार्यकर्त्यांनी व्हॉट्सअ‍ॅपच्या माध्यमातून जोडीदाराची विवेकी निवड या विषयाचे प्रशिक्षण देण्याची सुरुवात केलेली होती. या उपक्रमासाठी समितीअंतर्गत जून २०१६ पासून हा एक स्वतंत्र विभाग सुरू करण्यात आला. विभागाला विचारांची स्पष्टता देण्याचे काम तत्कालीन राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांनी केले आणि हा उपक्रम तरुणाईपर्यंत थेट पोहोचला, लोकप्रिय झाला.

अलीकडे या विभागाच्या वतीने तरुणांसाठी आणि त्याचसोबत पालकांसाठीही संवाद शाळा घेण्यात येतात. या उपक्रमांतर्गत व्हॉट्सअ‍ॅपद्वारे ४५ दिवसांच्या सखोल प्रशिक्षणाचा कार्यक्रम घेतला जातो. आजपर्यंत अशा २४ तुकड्यांचे प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे आणि या प्रशिक्षणाची मागणी वाढतेच आहे. त्यामुळे ही मागणी पूर्ण करण्यासाठी प्रशिक्षकांची गरज भासते. म्हणून सोलापूर येथे २८-२९ जून २०२५ असे दोन दिवसांचे एक प्रशिक्षकांचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर तसेच विद्या विकास प्रतिष्ठान



यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय 'जोडीदाराची विवेकी निवड, प्रशिक्षकांचे प्रशिक्षण' आयोजन करण्यात आले. हे शिबिर एच. डी. शिंदे कॉलेज, सोरेगाव, सोलापूर येथे अत्यंत उत्साही वातावरणात पार पडले. विवाहासाठी विवेकी विचारांनी जोडीदार निवडणे असा एक नवा दृष्टीकोन तरुण पिढीत रुजविण्याचा हा उपक्रम आहे. अतिशय संवेदनशील आणि भावनिक विषय असल्याने त्याच पद्धतीचे संवादक, प्रशिक्षक तयार करण्यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

विवाहसंस्थेबाबतचे पारंपरिक समज, सामाजिक दबाव, लिंगाधारित भूमिका, प्रेम आणि आकर्षण यामधील फरक, संवाद कौशल्य आणि विवेकी निर्णयप्रक्रिया अशा अनेक मुद्द्यांवर साधकबाधक चर्चा झाल्या. सत्रांमध्ये प्रातिनिधिक उदाहरणे, गतिविधी (Activities) आधारित संवाद, स्लाइड्स आणि थेट अनुभवकथन अशा सर्व गोष्टींचा समावेश करून, प्रत्येक सहभागी व्यक्तीला वैयक्तिक विचारमंथनाची संधी मिळेल असे प्रशिक्षणाचे नियोजन होते.

प्रशिक्षण शिबिराची सुरुवात डॉ. सचिन जम्मा यांनी

केली. विवाहपूर्व वैद्यकीय तपासणी व चाचण्या करणे किती गरजेचे आहे व कोणकोणत्या चाचण्या करायला हव्यात याबद्दल खूप महत्त्वपूर्ण मार्गदर्शन त्यांनी केले. डॉ. जम्मा हे सुरुवातीपासूनच अंनिसच्या 'जोविनि' उपक्रमाशी जोडलेले आहेत. महेंद्र, आरती व कृष्णात यांनी 'जोविनि'ची पंचसूत्री, जोडीदाराची विवेकी निवड का? जोडीदाराची विवेकी निवड कशी? सहजीवनातील समता, प्रेम आणि हिंसा यावर विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन केले. डॉ श्रीकांत पाटणकर यांनीही मानसिक आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले.

शिबिराच्या शेवटी सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थी कार्यकर्त्यांचे प्रतिनिधी म्हणून स्नेहल, मानसी, महेश, भाग्यश्री, सेवेंद्र, अनिकेत, सुमित्रा या कार्यकर्त्यांनी त्यांच्या मनोगतातून या उपक्रमाने त्यांच्या वैयक्तिक आणि सामाजिक दृष्टीकोनात झालेल्या बदलांविषयीचे अनुभवकथन केले. सुमित गाडेकर म्हणाले की, 'या शिबिरातून प्रशिक्षक म्हणून जबाबदारीची जाणीव तर झालीच, त्याचबरोबर माझ्यासाठी हा एक अंतर्मुख करणारा अनुभव आहे. कारण नात्यांकडे बघण्याचा एक नवा आरसा माझ्यापुढे उभा राहिला आहे.' सुमित्रा देशमुख यांच्या मते, 'लग्न म्हणजे फक्त एक सामाजिक औपचारिकता नसून ती एक विवेकाधिष्ठित कृती असायला हवी, याची जाणीव या संवादशाळेने करून दिली.' प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करताना प्रशिक्षणार्थींचा उत्साह, ऊर्जा आणि समाजात संवादक होण्यासाठी त्यांनी दाखवलेली तयारी हेच अंनिसच्या 'जोडीदाराची विवेकी निवड' या विभागाच्या भविष्याचे आश्वासक चित्र आहे.

डॉ. सुरेश व्यवहारे यांनी प्रशिक्षणाच्या संपूर्ण वेळापत्रकाचे कुशल नियोजन केले. विविध ठिकाणांहून आलेल्या सहभागींमध्ये परस्पर सुसंवाद, खुलेपणा आणि मैत्रीचे नाते निर्माण होणे हे या शिबिराचे अनोखे वैशिष्ट्य ठरले. सत्रांमधील चर्चांपासून तर सहभागींच्या रात्री उशिरापर्यंत चाललेल्या चर्चांमध्येही विषय गांभीर्याने समजून घ्यायची जिज्ञासा सतत दिसून आली.

संवादकांच्या या दोन दिवसीय प्रशिक्षणामध्ये कोल्हापूर, छ. संभाजीनगर, वाशिम, लातूर, बदलापूर आणि सोलापूर अशा विविध भागांतून आलेल्या सुमारे ३० प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला. प्रमुख प्रशिक्षक म्हणून आरती नाईक, महेंद्र नाईक, कृष्णात स्वाती यांनी जबाबदारी पार पाडली. याशिवाय विविध सत्रांमध्ये दीक्षा काळे, स्वाती कृष्णात व रेश्मा खाडे यांनी घेतलेल्या विविध गतिविधींमधून सहभागींना चौकटीबाहेर विचार करण्याचे प्रेरणादायी अनुभव मिळाले. सर्व प्रशिक्षकांनी केवळ माहितीपुरता संवाद न करता प्रशिक्षणार्थींचा सहभाग वाढवणारी, विषयाचे आकलन वाढवणारी आणि त्यांची विषयाबद्दलची वैचारिक जाणीव व्यापक होईल अशाप्रकारे मांडणी केली.

प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. जी. के. देशमुख, संस्थापक अध्यक्ष, विद्या विकास प्रतिष्ठान यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी मा. डॉ. सुधीर लातूरे, रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय बनसोडे, राज्य कार्याध्यक्ष, महाअंनिस हे होते. यावेळी सामाजिक कार्यकर्ते कॉ. रवींद्र मोकाशी, डॉ. अरूण गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी, विद्या विकास प्रतिष्ठान संस्था, माधव बावगे, राज्य अध्यक्ष, महाअंनिस, ॲड. गोविंद पाटील, कार्यवाह, कायदे व्यवस्थापन विभाग, डॉ. सचिन जम्मा, आरती नाईक, राज्य सरचिटणीस, सुधाकर काशीद, राज्य सरचिटणीस, रेश्मा खाडे, राज्य कार्यवाह, जोविनि विभाग, धर्मराज चवरे, सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष हे उपस्थित होते. या प्रशिक्षणाचे संयोजक व समन्वयक डॉ. सुरेश व्यवहारे यांनी या सत्राचे सूत्रसंचालन केले. यावेळी रोटरी क्लब ऑफ जुळे सोलापूर, यांचे पदाधिकारी सर्व रोटरी विक्रम बंडेवार, अध्यक्ष, प्रमोद देशपांडे, सेक्रेटरी, डॉ. नयना व्यवहारे, गायत्री देशमुख, जया चलगिरी, रवी पाटील, नितीन प्रभुणे, अश्विनी झांबरे, हर्षल देशमुख, पल्लवी बंडेवार, डॉ. सचिन जम्मा यांचेसह ऋषिकेश बदामीकर, व्ही. डी. गायकवाड आदि उपस्थित होते.


'जोडीदाराची विवेकी निवड' या संकल्पनेभोवतीचे हे प्रशिक्षण फक्त दोन दिवसांचे असले तरी त्यातून आयुष्यभरासाठी शिदोरी ठरतील अशा काही मूल्यांची पेरणी करण्याचा प्रयत्न असतो. या संवादशाळेत वैचारिक समृद्धी, सामाजिक जबाबदारी आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत वैयक्तिक सहभाग अशा बाबींचे प्रतिबिंब उमटले. 'एका सुसंवादातून विवेकी समाजाच्या दिशेने टाकलेले एक ठोस पाऊल' असा या यशस्वी कार्यक्रमाचा संपूर्ण अनुभव थोडक्यात सांगता येईल.

**(लेखिका महा.अंनिसच्या जोडीदाराची विवेकी निवड या विभागाच्या राज्य कार्यवाह आहेत.)**

●

# महा. अंनिसचा असाही हितचिंतक, देणगीदार

**विनम्र अभिवादन**



**दिवंगत सिताराम बळीराम कोल्हे**

नाशिकच्या पंचवटी परिसरातील अमृतधाम या उपनगरात आपल्या पत्नी प्रतिभाताई यांच्यासह गेली चाळीस वर्षे वास्तव्यास असणारे सीताराम बळीराम कोल्हे यांचे दिनांक २० मार्च, २०२५ रोजी वयाच्या ८१ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांनी अठरा वर्षांपूर्वीच देहदानाचा फॉर्म भरलेला होता आणि आपल्या पत्नी प्रतिभाताई यांना सांगून ठेवले होते की मृत्यूनंतर त्यांचा मृतदेह जवळच्या वैद्यकीय महाविद्यालयाला दान करण्यात यावा. तसेच मृत्यूनंतर कोणतेही धार्मिक कर्मकांड न करता त्यापोटी वाचणार्या खर्चाची रक्कम महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला देणगीच्या स्वरुपात द्यावी.

त्यांच्या मृत्यूनंतर पतीच्या इच्छेप्रमाणे प्रतिभाताई यांनी जवळच्या नातेवाईकांच्या मदतीने मृतदेह वैद्यकीय महाविद्यालयाला दान केला. त्यानंतर कोणतेही धार्मिक कर्मकांड केले नाही. त्यापोटी वाचलेली अंदाजे ७५,०००/- रुपयांची रक्कम महा. अंनिसला देणगी म्हणून कुठे आणि कशी द्यावी याबाबत त्या चिंतेत होत्या. म्हणून त्यांनी त्यांचा भाचा पंकज व भाचेसून रुपाली नेमाडे यांना महाराष्ट्र अंनिसचा संपर्क मिळवण्यास सुचवले. पंकज यांनी सोशल मीडियातून महाराष्ट्र अंनिसचे माजी अध्यक्ष अविनाश पाटील यांचा मोबाईल नंबर मिळवून संपर्क साधला. अविनाश भाईंनी त्यांना माझा संपर्क क्रमांक दिला. पंकज यांच्याशी माझे बोलणे झाल्यावर ३ जुलै, २०२५ रोजी नाशिक जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. आशा लांडगे, तरुण कार्यकर्ता आशुतोष पिंगळे आणि मी दुपारी दोन वाजता कोल्हे कुटुंबीयांच्या घरी पोहोचलो. तेथे प्रतिभाताई कोल्हे, त्यांचा एक पुतण्या तसेच पंकज व रुपाली उपस्थित होते. स्मृतिशेष सीताराम कोल्हे यांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करून आम्ही कुटुंबीयांची आस्थेवाईकपणे विचारपूस केली आणि त्यांच्याविषयी माहिती मिळवली.

मूळचे जळगाव जिल्ह्यातील सावदा येथील स्मृतिशेष सीताराम हे ओझर येथील विमान कारखान्यात नोकरीला होते. ते अतिशय शिस्तबद्ध आणि मनमिळावू स्वभावाचे होते. ते नियमितपणे व्यायाम करीत. आपल्या पोटी मूलबाळ नाही याबाबत खंत न बाळगता ते पत्नीला धीर देत. गावाकडील शाळेतल्या गुणवंत विद्यार्थ्यांना ते नेहमी मदत करीत, त्यांचे कौतुक करीत. ते वस्तुनिष्ठ व विवेकी विचार करणारे होते. समाजातील विवाहेच्छुक मुलामुलींचे विवाह जुळवण्यात त्यांना विशेष रस होता. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांना ते प्रोत्साहन देत. त्यामुळे मुलामुलींच्या विवाहाबाबत चिंता असणाऱ्या अनेक माता-पित्यांचे ते आधारस्तंभ होते. महा. अंनिसला देणगी देण्याची इच्छा त्यांनी का व्यक्त केली, असे प्रतिभाताईंना विचारले असता त्या म्हणाल्या की, समाजातील अनिष्ट, अघोरी रूढी, प्रथांविरोधात तुम्ही केलेल्या कार्याच्या पेपरातल्या बातम्या ते कधी कधी सांगत. मित्रांशी बोलताना ते म्हणत, हे लोक किती मोठे, महत्त्वाचे काम करत असूनही त्यांची फारशी कुणी दखल घेत नाही. म्हणून आपण त्यांना मदत केली पाहिजे. एवढं बोलून प्रतिभाताईंच्या डोळ्यात पाणी आले. मात्र आपल्या पतीचा शब्द आज खरा करीत आहोत, याचा एक वेदनामिश्रीत आनंदही त्यांच्या चेहऱ्यावर जाणवत होता. स्मृतिशेष सीताराम कोल्हे यांच्या इच्छेनुसार त्यांच्या मृत्यूनंतर कसलेही धार्मिक विधी न करता वाचलेल्या ७५,०००/- रु. रकमेच्या देणगीचा धनादेश प्रतिभाताई यांनी आमच्याकडे सुपूर्द केला.

खरेतर महा. अंनिसशी कृतिशीलतेने जोडलेले नसताना सुद्धा अशा मध्यमवर्गीय व्यक्तीने संघटनेच्या विचारांची, कार्याची दखल घ्यावी आणि मृत्यूनंतर एवढ्या मोठ्या रकमेची देणगी देण्याची व्यवस्था करावी आणि कुटुंबियांनी ती तंतोतंत अंमलात आणावी असे क्वचितच होते. शिवाय संघटनेचे विचार आपल्या नकळत जनमानसात कसे झिरपत गेलेले आहेत हे ही दिसून येते. प्रतिभाताईंना अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचा वार्षिक विशेषांक, महा. अंनिसच्या साडेतीन दशक वाटचालीची पुस्तिका आणि आभार पत्र देऊन आम्ही त्यांचे व त्यांच्या नातेवाइकांचे आभार मानले.

कोल्हे कुटुंबीयांनी महाराष्ट्र अंनिसच्या सर्व कार्यकर्त्यांना एक प्रेरणा दिलेली आहे. त्याच बरोबर आपली जबाबदारी देखील वाढली आहे याचे भान ठेवू या. विवेकाचा आवाज बुलंद करूया...

**डॉ. ठकसेन गोराणे/प्रा. आशा लांडगे**, नाशिक



# भोंदूबाबाने केले डिजिटल माध्यमातून 'हायटेक' शोषण

**उत्तम जोगदंड ।** पुणे
मो. ९९२०१२८६२८

भोंदू बुवा-बाबा-अम्मा कोणत्याही धर्माचे असोत, त्यांची एक सदैव यशस्वी ठरणारी मोडस-ऑपरेंडी (गुन्हे करण्याची विशिष्ट पद्धती) प्रचलित आहे. आपल्यात दिव्य आध्यात्मिक शक्ती असल्याचा दावा करणे, ती दाखवण्यासाठी विज्ञानाधारित किंवा हातचलाखीचे 'चमत्कार' करणे, ते पाहून भोळ्या लोकांचे भुलणे, त्यानंतर भोळ्या भक्तांचे पूर्णतः शरण जाणे आणि मग या बाबा-बुवांनी त्यांचे मनसोक्त आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषण करणे; हीच ती मोडस ऑपरेंडी. विज्ञान-तंत्रज्ञानात अत्यंत वेगाने होत असलेल्या प्रगतीचा हे बुवा-बाबा अलीकडे आपली दैवी शक्ती सिद्ध करण्यासाठी कौशल्याने गैरवापर करून 'हायटेक' शोषण करीत असतात. याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे पुणे जिल्ह्यातल्या मुळशी तालुक्यातील सुस गावात स्वामी समर्थ बिल्डिंगमध्ये एक मठ उभारून आपला भोंदूगिरीचा धंदा करणारा प्रसाददादा उर्फ बाबा उर्फ प्रसाददादा भीमराव तामदार, वय वर्षे २९ फक्त.

या भोंदू प्रसाद बाबावर आरोप आहे की, त्याने भक्तांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून मोबाइल पासवर्ड जाणून घेऊन आणि काही वेळ स्वतःकडे मोबाइल ठेवून घेऊन त्यात 'एयर ड्रॉइड किड्स' नावाचे छुपे ॲप त्यांच्या नकळत इन्स्टॉल केले आणि ते हाइड केले (लपवले). हे ॲप अनेक पालक आपल्या आणि आपल्या पाल्याच्या (त्याच्या नकळत) मोबाइलमध्ये इन्स्टॉल करून त्याच्या मोबाईल वापरावर संपूर्ण नियंत्रण ठेवू शकतात, त्याच्या हालचालींवर नजर ठेवू शकतात. या ॲपमार्फत पाल्याच्या मोबाईलचा पुढील किंवा मागील कॅमेरा चालू करून तो काय करतो आहे ते पालक पाहू/ऐकू शकतात, त्यातील मेसेजेस, फोटो, फोन नंबर पाहू शकतात आणि एकूणच मोबाईलवर पूर्ण नियंत्रण मिळवू शकतात. हे ॲप हाइड केलेले (लपवलेले) असल्याने पाल्याला आपले पालक आपल्यावर पाळत ठेवून आहेत, त्यांना आपण काय करतो ते सर्व दिसते आहे, हे कळतही नाही. भोंदू प्रसाद बाबाने या ॲपचा वापर आपल्या कह्यात आलेल्या अनुयायांवर पाळत ठेवण्यासाठी केला.

या ॲपचा वापर करून प्रसाद बाबा आपल्या भक्तांना विविध विधींचा भाग म्हणून वेश्यागमन, अनैतिक शारीरिक संबंध आणि इतर अश्लील कृत्ये करण्यास भाग पाडत असे. याबाबत पुणे जिल्ह्यातील बावधन पोलीस ठाण्यात दिनांक २८ जून २०२५ रोजी एका बांधकाम व्यावसायिकाच्या तक्रारीवरून एफआयआर क्र. ०२७ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या एफआयआरवर



(फोटो सौजन्यः भारत एक्सप्रेस)

एक नजर टाकल्यास हा बाबा आपल्या भक्तांना किती किळसवाणी कृत्ये करायला भाग पाडायचा हे लक्षात येईल. भारतीय न्यायसंहिता २०२३ कलम ७५(१), ३१८(४), माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० कलम ६७(अ) आणि जादूटोणा विरोधी कायदा कलम ३ अन्वये त्याच्यावर गुन्हे दाखल केले गेले आहेत. सदर एफआयआर महाराष्ट्र पोलिसांच्या वेबसाइटवर ऑनलाइन उपलब्ध आहे.

आर्थिक अडचणीत असलेल्या या बांधकाम व्यावसायिकाने आपल्या मित्राच्या सल्ल्याने या बाबाशी संपर्क साधला. त्यावर बाबाने या व्यावसायिकाची पत्रिका आणि फोटो मागून घेतला. त्यातील 'दोष' सांगून

आपल्याकडे दैवी शक्ती असल्याचे भासवून त्याच्या समस्यांवर उपाय सुचवताना बाबाने आपण सांगू तसेच करावे लागेल अशी ताकीद दिली. त्याला मंत्रजप करायला सांगून मंत्रजप होईपर्यंत 'कंपास' नावाचे ॲप (दिशादर्शक होकायंत्र) पुढील विधीसाठी इंस्टॉल करण्यासाठी फोन आपल्याकडे ठेवायला आणि पासवर्ड द्यायला सांगितले. मंत्रजप पूर्ण झाल्यावर त्याने हे कंपास ॲप इन्स्टॉल केले आहे असे त्या व्यावसायिकास दाखवले देखील. त्यामुळे बाबाने आपल्या मोबाईलचा दुरुपयोग केलेला नाही याबाबत भक्ताची खात्री पटली. परंतु त्याच वेळेस प्रसाद बाबाने या मोबाइलमध्ये 'एयर ड्रॉइड किड्स' हे छुपे ॲप इन्स्टॉल केले होते हे त्या भक्ताच्या लक्षातही आले नाही.

त्यानंतर भोंदू बाबाने वेगवेगळे विधी करायला सांगणे आणि त्यासोबत पैशांची मागणी करणे अशी एक शृंखलाच सुरू झाली. या विधींच्या नावाने त्याने आपल्या भक्तासोबत जे लैंगिक कृत्य केले आणि अनेक अन्य लैंगिक कृत्ये करायला तसेच वेश्यागमन करायला भाग पाडले त्याचे तपशील इथे देणे उचित नाही. भक्ताच्या समस्येवरील उपाय म्हणून खास विधी करणे आणि विधीचा भाग म्हणून ही सर्व अश्लील कृत्ये करणे आवश्यक असल्याचे तो भक्तास ठासून सांगे. भक्ताच्या मोबाइलमध्ये इन्स्टॉल करून लपवलेल्या 'एयर अँड्रॉइड किड्स' ॲपमुळे बाबाला भक्ताच्या सर्व हालचाली कळत आणि त्या तो भक्ताला सांगत असे. हे तुम्हाला कसे कळले, असे विचारल्यावर आपल्यात दिव्य शक्ती व आत्मानुभूतीचे ज्ञान असल्याचा दावा तो करत असे, त्यामुळे त्याचा भक्तावर अधिकच प्रभाव पडत असे. परंतु एकदा तक्रारदार भक्तास हे ॲप अधिक मेमरी वापरत आहे, असा संदेश मोबाईलवर आला आणि आपल्या मोबाइलमध्ये ते इन्स्टॉल केले गेल्याचे लक्षात आले तेव्हा भोंदू बाबाचे बिंग फुटले. तंत्रज्ञानाचा असा दुरुपयोग करणाऱ्या या भोंदू बाबाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे तो आपल्याकडे येणाऱ्या भक्तांची कुंडली देखील मागून घेत असे आणि त्यानुसार कुठले ना कुठले 'दोष' असल्याचे सांगून सतत काहीतरी बरेवाईट होण्याची भीतीही घालत असे. लोकांचा कुंडली या छद्मवैज्ञानिक प्रकारावर आंधळा विश्वास असल्याने बाबाचे काम सोपे होत असे.

या भोंदू बाबाचे महिलांना अंघोळ घालतानाचे, महिलांसोबत विचित्र नाच करत असतानाचे, तसेच महिलांची ओटी भरत असतानाचे व्हिडिओ याआधी सोशल मीडियावर व्हायरल झालेले आहेत. या भोंदू बाबाला मानणारा मोठा भक्त परिवार पुणे परिसरात आणि महाराष्ट्रात आहे असे समजते. तसेच सोशल मीडियावर त्याचे दीड लाख फॉलोअर्स असल्याचे आणि त्याच्याबाबत अनेकांनी चांगल्या प्रतिक्रिया दिलेल्या असल्याचे तक्रारदाराने एफआयआर मध्ये म्हटले आहे.

या बाबाने अशा प्रकारे अनेक लोकांची फसवणूक केलेली असण्याची शक्यता आहे. अशा लोकांनी तक्रार करण्यास पुढे यावे असे आवाहन पोलिसांनी केलेले आहे. परंतु एकीकडे हा 'दिव्य शक्ती' असलेला बाबा आपले काही बरेवाईट करेल अशी भीती, तर दुसरीकडे बदनामीची भीती या कात्रीत अडकल्याने लोक पुढे येत नसावेत.

हे प्रकरण आणि या बाबाची माहिती वाचल्यावर काही प्रश्न पडतात.

१) एवढे शिकले-सवरलेले, व्यवसायात आपले बुद्धिचातुर्य वापरणारे लोक अशा भोंदू बाबांच्या फसवणुकीस एवढ्या सहज बळी कसे पडतात?
२) वेश्यागमन आणि अन्य लैंगिक कृत्ये करायला लावणे किंवा बाबाने तसे कृत्य आपल्याशी करणे हे आपल्या समस्येवरील उपाय म्हणून एखाद्या विधीचा भाग असू शकतो, यावर यांचा विश्वास बसतोच कसा?
३) ज्या महिला एकंदरीत समाजात वावरताना केवळ आपल्या तीक्ष्ण नजरेने आणि उपजत गुणांनी पुरुषांची वाईट नजर ओळखू शकतात, गुड टच-बॅड टच ओळखतात, त्या महिलांना अशा लंपट भोंदू बाबाकडून अंघोळ करवून घेणे कसे काय चालते?

असे अनेक प्रश्न आहेत. बिरबलास बादशाहने, भाकरी का करपते? घोडा का अडतो? पाने का सडतात? असे तीन प्रश्न विचारून त्याचे एकच उत्तर देण्याचे आव्हान केले होते आणि त्याचे उत्तर 'न फिरवल्याने' असे बिरबलाने दिल्याची कथा आपण ऐकलेली आहे. त्याचप्रमाणे वरील तीन प्रश्नांचे उत्तर देखील एकाच शब्दात देता येईल, 'अंधश्रद्धेमुळे'. ही अंधश्रद्धा येते अविवेकातून, अज्ञानातून, लोभातून तसेच भीतीतून. व्यवहारातील आर्थिक अडचण एखादा बाबा त्याच्या दिव्य शक्तीने दूर करू शकतो हा विचार अविवेक आहे. अशा प्रकारचा कोणी सल्ला दिला तर एखादी व्यक्ती त्याला बळी

पडते, त्यावर तिचा विश्वास बसतो तो अज्ञानातून. थोड्या काही कर्मकांडांनी, विधींनी भरपूर घबाडाचा लाभ होऊ शकतो आणि आपली आर्थिक अडचण दूर होऊ शकते, अशा बदसल्ल्याला माणूस बळी पडतो तो लोभातून. कुंडलीनुसार अमुक 'दोष' आहे, त्यावर उपाय केले नाहीत तर आपले किंवा कुटुंबीयांचे काही बरेवाईट होईल ही परंपरागत भीती. दैवी शक्ती असलेल्या बाबाचे ऐकले नाही तर आपले काही अधिक वाईट होईल की काय ही भीती. हा बाबा आपल्याला जे काही करायला लावेल त्याने आपल्याला नक्कीच फायदा होईल, आपले भले होईल ही अंधश्रद्धा. एकदा का ही अंधश्रद्धा ठाम रूजली की मग बाबा आपले आर्थिक, शारीरिक आणि मानसिक शोषण करीत असला तरी तो आपल्या समस्यांवरील उपायच वाटतो. त्यापायी काय वाट्टेल ते करायला लोक तयार होतात, अगदी नरबळी द्यायची देखील त्यांची तयारी होते.

महाराष्ट्र अंनिस वैज्ञानिक दृष्टीकोनाचा पुरस्कार करीत जनसामान्यांना विवेकी बनविण्याचा, कुंडली, फलज्योतिष वगैरे बाबत असलेली अनाठायी भीती घालविण्याचा सतत प्रयत्न करीत आहे. त्याचबरोबर असे फसवणुकीचे, शोषणाचे, अन्याय-अत्याचाराचे प्रकार घडलेच, तर शोषितांच्या मदतीलादेखील धावून जाते. तसेच अशा प्रकारांना पायबंद घालण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहे. कोणत्याही भोंदू बुवा-बाबाचा धर्म किंवा जात न बघता आणि बुरसटलेल्या सनातनी प्रवृत्तींच्या विरोधाला न जुमानता या भोंदू बुवा-बाबांना महाराष्ट्र अंनिस कायद्याचा दणका देतच असते. सामान्य माणसाकडून अपेक्षा एवढीच आहे की, त्याने महाराष्ट्र अंनिसच्या सोबत यावे, या संघटनेचे कार्य स्वतः समजून घ्यावे आणि इतरांना सांगावे; स्वतःची आणि इतरांची फसवणूक व शोषण थांबवून निर्भयतेने, नैतिकतेने, वैज्ञानिक दृष्टीकोन धारण करीत जीवन जगताना आपल्या जगण्याचा, आयुष्याचा दर्जा उंचवावा.

●

## इटावा (उ.प्र.) येथील यादव समाजाचे कथावाचक प्रकरण : जातिभेदाचा भेसूर चेहरा

जातिभेदातून पूर्वास्पृश्य जातींच्या लोकांवर सवर्णांनी अन्याय-अत्याचार करणे देशाला नवीन नाही. परंतु अस्पृश्यही नाही आणि ब्राह्मणही नाही अशा यादव जातीच्या व्यक्तीदेखील हिंदू धर्मातील 'उच्च' वर्णियांच्या जातिभेदाच्या शिकार झाल्याची घटना नुकतीच घडली आहे. ही घटना उत्तर प्रदेशातील इटावा येथील दादरपूर गावात २२-२३ जून २०२५ च्या रात्री घडली. मुकुट मणि यादव आणि त्यांचे सहकारी संत सिंह यादव यांना भागवत कथावाचनासाठी निमंत्रित करण्यात आले होते. परंतु दोन्ही कथावाचक हे ब्राह्मण नसून यादव आहेत हे कळल्यावर त्यांची शेंडी कापून त्यांच्यावर ब्राह्मण महिलेचे मूत्र शिंपडून त्यांना अवमानित केल्याचा आरोप या कथावाचकांनी केला आहे. उत्तर प्रदेशात या घटनेवरून सुरू झालेल्या यादवविरुद्ध ब्राह्मण संघर्षात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. कथावाचकांनी यजमान महिलेला स्पर्श केला, बनावट आधार कार्ड बनवून ब्राह्मण असल्याचे भासवले असे आरोप ब्राह्मण समाजाकडून केले जात आहेत. काही गावांत ब्राह्मणांना पूजाविधी करण्यास यादवांनी बंदी घातल्याचे फलक लागले आहेत. आंदोलन झाले आहे. यात राजकारणीही उतरले आहेत. दोन्ही बाजूंच्या अनेक लोकांना पोलिसांनी अटक केले आहे. यात भर घातली आहे शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी. प्रयागराज येथील कुंभमेळ्यात मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्याबाबतीत अनुदार उद्‌गार काढणाऱ्या बागेश्वरधाम शास्त्रीची निंदा या शंकराचार्यांनी केली आणि अयोध्येच्या अपूर्ण राममंदिरात प्राणप्रतिष्ठा करणाऱ्या हिंदुत्ववाद्यांची खरडपट्टी काढली व आपला पुरोगामी चेहरा दाखवण्याचा प्रयत्न केला. परंतु याच अविमुक्तेश्वरानंद यांचे 'सार्वजनिक कथावाचनाचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच आहे' या त्यांच्या वक्तव्यावरून सनातनी चेहऱ्याचे दर्शन झाले.

या प्रकरणी पोलीस तपासाचा निष्कर्ष काहीही येवो, एक वास्तव प्रकर्षाने सिद्ध होते आहे की, वर्णव्यवस्थेनुसार शूद्र गणल्या गेलेल्या लोकांनी ब्राह्मणांचे पारंपरिक कर्म केल्यास ते ब्राह्मणांना मान्य होत नाही. संविधानातील धर्मनिरपेक्षता मूल्यानुसार जातिभेद निषिद्ध असला तरी त्याच विषयीच्या चुकीच्या धार्मिक मान्यता लोक अजूनही पाळतात, हेही दिसून येते.

थोडक्यात, एखाद्या धर्माधिष्ठित देशात धार्मिक मान्यतांचे पालन व्हावे त्याप्रमाणे हिंदू धर्मीय शूद्रांनी आपल्या पायरीत राहिले पाहिजे, अशा मान्यतेच्या विकृती अद्यापही समाजात आहेत. शूद्र शंबुकाने रामायणात जी ज्ञानार्जनाची चूक केली त्याची पुनरावृत्ती आताच्या शूद्रांनी करू नये, असे या विकृतींना आजही वाटते. या विकृती आधुनिक विज्ञानाचा स्वीकार करून त्याचा उपभोग देखील घेतात; परंतु आधुनिक तर्कशुद्ध विचारसरणी मात्र स्वीकारायला अद्यापही तयार नाहीत, ही खेदाची बाब आहे.

या प्रकरणावरून काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात घडलेल्या हवामान खात्याच्या संचालक डॉ. मेधा खोले प्रकरणाची आठवण झाली. मराठा समाजातील निर्मला यादव (इथेही यादव!) यांनी खोले बाईंच्या घरी कुलकर्णी आडनाव सांगून स्वयंपाकाचे काम केले आणि त्यावरून 'आपले सोवळे मोडले' असा आरोप करून खोले बाईंनी तक्रारही दाखल केली होती. असे प्रकार घडतात तेव्हा पुरोगामी चळवळीचे एक गाणे आठवते...

'कसा गं बाई जातीचा ह्यो किला,  
धर्माचा ह्यो किला  
कोणाच्या रक्तानं बांधला  
कोणत्या भक्तानं बांधला...'

•

## पंढरीच्या वारीला धर्मवादी राजकारणाचा विळखा

पंढरीच्या वारीत अर्बन नक्षली शिरले आहेत, असा बिनबुडाचा आरोप आमदार मनिषा कायंदे यांनी नुकताच महाराष्ट्राच्या विधान परिषदेतील आपल्या भाषणात केला. हा निराधार आरोप करतांना त्यांनी अनेक विसंगत वक्तव्ये केली आहेत.

आपल्या भाषणात आ. कायंदे यांनी संविधान दिंडी, पर्यावरण दिंडी आणि अन्य दिंडयांचा उल्लेख केलेला आहे. या दिंडया समता, बंधुता ही संतांनीच समाजात रुजविलेली आणि संविधानाने अंगीकारलेली मूल्ये तसेच पर्यावरणरक्षण, वैज्ञानिक दृष्टीकोन या मूलभूत संविधानिक कर्तव्यांचा संदेश घेऊन वारीत सामील होतात, संविधानाच्या चौकटीत राहून संत समाजसुधारकांचा वारसा पुढे घेऊन जाणणारी महाराष्ट्र अंनिस सुद्धा या दिंडयांत अन्य समविचारी संघटनांसह सहभागी असते. या सर्वांना सरसकट अर्बन नक्षली ठरवून आ. कायंदे संविधानिक मूल्यांचा अवमान तर करतातच, शिवाय ही संविधानिक मूल्ये संतांच्या विचारांवरच आधारित असल्याने संतांचाही अवमान करताहेत. कारण संतांनी आपल्या काळात प्रस्थापित असलेल्या विविध अनिष्ट प्रथांविरोधात जाऊन समतेची, बंधुभावाची, विवेकाची वैश्विक मूल्ये लोकांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न केला, त्यांचीच मूल्ये वारकरी संप्रदायाने अनुसरली आहेत.

या दिंडीत सामील होणारे लोक देवाला न मानणारे, नास्तिक संघटनांचे आहेत असा निराधार आरोप त्यांनी केला आहे. हा आरोप करतांना त्या नास्तिक संघटनांना आणि लोकांना सुद्धा अर्बन नक्षली ठरवत आहेत. महा. अंनिसमध्ये तर सर्व जातिधर्माचे लोक आहेत. ही संघटना जनतेच्या देव-धर्म-श्रद्धा विषयक मूलभूत अधिकारांचा आदरच करते. अशा कार्यकर्त्यांना किंवा नास्तिकांना वारीत सामील होण्यास बंदी असल्याचा काही परंपरागत नियम किंवा धर्माज्ञा देखील अस्तित्वात नाहीत, किंवा कोणतेही तर्कशुद्ध कारण नाही. पंढरीच्या वारीत किंवा अन्य ठिकाणी विधायक, मानवतावादी आणि कालसुसंगत विवेकी विचारांची मांडणी करण्याचे स्वातंत्र्य सुद्धा संविधानाने भारतीय नागरिकाला दिलेले आहे.

मुळात 'देव मानू नका' अशी मांडणी महाराष्ट्र अंनिस कधीही करीत नाही. या दिंडीत देखील कधीही केलेली नाही. या वारीत तसे काही केल्याचा कोणताही पुरावा आ. कायंदे यांनी दिलेला नाही. या दिंडीत सामील असणारे अनेक ह. भ. प. कीर्तनकार, संत ज्ञानेश्वर पालखीचे चोपदार, विविध विवेकवादी संस्थांचे जबाबदार पदाधिकारी, पर्यावरणाची काळजी घ्या म्हणून सांगणारे पर्यावरणवादी, संतांच्या विचारांवर निष्ठा असलेले वारकरी आहेत. आमदार कायदे यांना हे सर्वजण कोणत्या अंगाने अर्बन नक्षली वाटतात?

**- डॉ. ठकसेन गोराणे**

# महा. अंनिसची खबरबात



**हंसराज महाले ।** तळोदा (जि. नंदुरबार)
मो. ९६७३६०६१६०

### सामाजिक न्याय

### पनवेल येथे समता मार्च

**पनवेल :** लोकराजा छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त पनवेलमध्ये प्रेरणादायी 'समता मार्च'चे आयोजन करण्यात आले. सामाजिक न्याय, समता आणि लोकशाही मूल्यांचा संदेश देणारा हा मार्च शिवाजी महाराज चौक येथून सुरू होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, वडाळे तलाव, सावरकर चौक मार्गे तुकाराम महाराज स्मारक येथे सांगता झाली. शाहू महाराजांच्या गीतांनी व घोषणांनी कार्यक्रमात उत्साह संचारला. या मार्चचे आयोजन महाराष्ट्र अंनिस – पनवेल शाखा, संविधान प्रचारक, मिशन माणुसकी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व सांस्कृतिक मंडळ यांनी संयुक्तपणे केले.

**कढोली, ता. कुरखेडा :** महा. अंनिस शाखा कढोलीच्या वतीने लोकराजा राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त माळी समाज भवन येथे सामाजिक न्याय दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंत इंदुकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून बंडुभाऊ बनसोड, लांजेवार सर व गंगाधर लोनबले उपस्थित होते. यावेळी मारोती वाढई, देवनाथ सोनुले,आकाश गुरनुले, सागर वाढई, होमराज नागोसे, ईश्वर चौधरी, नलेश्वर आदे, सहारे, नरेश मोहुर्ले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन ईश्वर चौधरी यांनी केले तर आभार प्रदर्शन गंगाधर लोनबले यांनी केले.

### शाहू महाराज जयंतीनिमित्त अभिवादन

**लातूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व समविचारी संघटनांच्या वतीने बिदर रोडवरील राजर्षी शाहू महाराज पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. या वेळी जिल्हा अनिस प्रधान सचिव डॉ. बळीराम भुकतरे यांनी शाहू महाराजांच्या सर्वसमावेशक समाज सुधारक कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमात अनिसचे जिल्हा उपाध्यक्ष व राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक विश्वनाथ मुडपे, बाबुराव माशाळकर, डॉ. दत्ता पाटील, प्राचार्य विजयकुमार पाटील, शिरीष रोडगे, पांडुरंग बोडके, प्रा. गोपाळ पाटील, डॉ. रामचंद्र भांगे आदी मान्यवर उपस्थित होते. शाहू महाराजांचा वैचारिक वारसा पुढे नेण्याचे कार्य महाराष्ट्र अंनिस करत असल्याचे मत वक्त्यांनी मांडले.

**चंद्रपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, ऊर्जानगर शाखेच्या वतीने आरक्षणाचे जनक व सामाजिक समतेचे प्रणेते छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिवस म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा प्रधान सचिव दुरेंद्र गेडाम यांनी केले. राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून त्यांच्या जीवनकार्यावर माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाला महाराष्ट्र अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष नारायण चव्हाण, उपाध्यक्ष भैय्याजी उईके, महिला कार्यवाहक कविता राजूरकर, शाखा कार्याध्यक्ष देवराव कोंडेकर, अध्यक्ष संजय जुनारे, उपाध्यक्ष शंकर दरेकर, लक्ष्मण बोरकर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सह. पतसंस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**भंडारा :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, जिल्हा भंडारा यांच्या वतीने लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाला राज्य बुवाबाजी संघर्ष समितीचे राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे, जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. युवराज खोब्रागडे, जिल्हा प्रधान सचिव चंद्रशेखर भिवगडे, जिल्हा वैज्ञानिक जाणीवा कार्यवाह अचल दामले तसेच कविता लोणारे, रुपाली लोणारे, बाळकृष्ण गायधने, मयुर गायधने आदी उपस्थित होते.

### जादूटोणाविरोधी कायद्याची जनजागृती

**नंदुरबार :** राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त राज्य समाजकल्याण विभाग, जिल्हा समाजकल्याण आयुक्त कार्यालय, बार्टी आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने

नंदुरबार येथे सामाजिक न्याय दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजकल्याण आयुक्त सुंदरसिंग वसावे होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रधान सचिव बालदेव वसईकर यांनी जादूटोणा विरोधी कायदा २०१३ व त्याच्या अंमलबजावणीची सविस्तर माहिती दिली. त्यांनी या कायद्याची निर्मिती प्रक्रिया, बारा कलमांचे स्पष्टीकरण, दक्षता अधिकाऱ्यांची नेमणूक व कार्यक्षेत्र तसेच समाजातील गैरसमज या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या मंचावर निरीक्षक, समाजकल्याण विभाग, विवेकानंद चव्हाण, कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा नंदुरबार सूर्यकांत आगळे, आस्थापना विभाग समाजकल्याण कैलास देशमुख आणि प्राचार्य वि.जा.भ.ज. आश्रमशाळा पाटील सर उपस्थित होते.महिला सहभाग विभागाच्या प्रतिनिधी मीनाक्षी आगळे व रेखा तायडे हे देखील कार्यक्रमाला उपस्थित होते.

## परिसंवादाचे आयोजन

**लासूर स्टेशन :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, लासूर स्टेशन (जि. छ. संभाजीनगर) शाखेच्या वतीने लोकराजा राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त राजर्षी शाहू महाराज-बहुआयामी व्यक्तिमत्व या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी भास्कर बनसोडे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून कार्याध्यक्ष जगजीवन सातदिवे उपस्थित होते. वक्ते प्रा. शशिकांत सांगवीकर, गोविंद हिवाळे, मच्छिंद्र बडोगे, प्रशांत दाभाडे, मच्छिंद्र पानकर, गौतम गवई, श्रीहरी शेलार, गवई सर, बळीराम मोरे यांनी शाहू महाराजांच्या विविध पैलूंवर विचार मांडले. ज्ञानेश्वर वाघचौरे यांनी विवेकी विचार व परिवर्तनवादी भूमिकेवर सविस्तर भाष्य केले. या प्रसंगी शशिकांत सांगवीकर यांचा ॲबॅकस परीक्षेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन प्रशांत दाभाडे तर आभार भास्कर बनसोडे यांनी मानले.

## जिल्हा कार्यकर्ता मेळावा

**खारघर (नवी मुंबई) :** लिटिल एलिट्स प्रिस्कूल, खारघर येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा नवी मुंबई जिल्हा कार्यकर्ता मेळावा उत्साही वातावरणात पार पडला. या मेळाव्यास प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे, अरविंद सोनटक्के, अशोक निकम, प्रदीप कासुर्डे, अमोलकुमार वाघमारे, राजेंद्र गरड, कलावत सर, कल्पना शिंदे, गोपीनाथ तुळसनकर, एम. डी. काळे, गजानन जाधव, अविनाश जाधव, किरण वाळुंज, पवन कोकाटे, जितेंद्र बनसोडे, महेंद्र राऊत, राजेंद्र पंडित आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## जिल्हा कार्यकारिणी बैठक

**भंडारा :** विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीनंतर भंडारा जिल्हा कार्यकारिणीची पहिली बैठक पार पडली. या बैठकीस अंनिसचे राज्य सरचिटणीस गजेंद्र सुरकर, वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पाचे राज्य सहकार्यवाह पी. एम. जाधव, विलास निंबोरकर, विठ्ठल कोठारे, बुवाबाजी संघर्ष विभागाचे राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे, प्रा. युवराज खोब्रागडे, चंद्रशेखर भिवगडे, अचल दामले यांच्यासह सौ. कविता लोणारे, सौ. रूपाली लोणारे, अवनी लोणारे, मानव लोणारे आदी उपस्थित होते. राज्य पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने कार्य करण्याचे आवाहन केले.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**नागपूर :** जिल्हातील कोराडी येथील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा कार्यालयामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी शाखा अध्यक्ष ताराचंद पखिडे यांनी अण्णा भाऊंच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. कामगार नेते चैनदास भालादरे यांनी अण्णाभाऊंचे कामगार चळवळीत मोठे योगदान असल्याचे मत व्यक्त केले तर शाखा कार्याध्यक्ष बबन गायकवाड यांनी अण्णाभाऊंच्या खडतर जीवन प्रवासाचे जीवन चरित्र वाचून प्रेरणा मिळाल्याचे सांगितले. जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी अण्णाभाऊंना पैशाअभावी वाटेगाव ते मुंबई प्रवास रेल्वे मालगाडीच्या डब्यातून करावा लागला व मुंबईतील दुकानाच्या नावाचे मोठमोठे फलक वाचून शिक्षणाची सुरुवात झाली, अशा दुर्मीळ आठवणींना उजाळा देत कार्यकर्त्यांनी अण्णाभाऊंचा स्मृतिदिन साजरा केला. कार्यक्रमाला धम्मानंद सोनवणे यांच्यासह फुटपाथ दुकानदार व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार शाखा प्रधान सचिव विलास भालेराव यांनी केले.

**गडचिरोली :** महिला महाविद्यालय व महाराष्ट्र अंधश्रद्धा

निर्मूलन समितीच्या संयुक्त विद्यमाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृती दिनानिमित्त महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. योगेश पाटील होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून महा. अंनिसचे राज्य सरचिटणीस विलास निंबोरकर, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या वरिष्ठ अधिकारी चंदा मंगर, लहुजी रामटेके, हरिदास कोटरंगे व उपेंद्र रोहनकर उपस्थित होते. उपेंद्र रोहनकर यांनी अण्णाभाऊ साठेंवर कविता सादर केली. निंबोरकर यांनी त्यांच्या संघर्षमय जीवनावर आणि साहित्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना त्यांचे लेखन वाचण्याचे आवाहन केले. चंदा मंगर यांनी मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांवर होणाऱ्या परिणामांबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थिनी प्रिती मेश्राम व छाया इटकेलवार यांनी अण्णाभाऊ साठेंच्या कार्यावर भाष्य केले, ज्यांचे कौतुक चंदा मंगर यांच्या हस्ते मासिक अंक देऊन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा.विलास पारखी तर आभारप्रदर्शन सुनिता साळवे यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा. ज्ञानेश्वर धकाते व प्रा.वीणा तुमडे यांनी सहकार्य केले.

### वैज्ञानिक दृष्टीकोन व व्यसनमुक्ती जनजागृती

**कोराडी :** विद्या मंदिर हायस्कूल, के. टी. पी. एस. कोराडी येथे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन व व्यसनमुक्तीबाबत जनजागृतीसाठी वैज्ञानिक प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस. एम. भस्मे होते. प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र अंनिसचे राज्य सरचिटणीस विलास निंभोरकर, शाखाध्यक्ष ताराचंद पखिडे व शिक्षिका अनिता पाटील यांचा समावेश होता.विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक प्रयोगांद्वारे शास्त्रीय कारणे समजून घेतली. जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे यांनी १२५ विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. सूत्रसंचालन अनिता पाटील तर आभार विभा माने यांनी मानले.

### नवविवाहित जोडप्यांना व्यसनमुक्तीची शपथ


**नागपूर :** नशा मुक्त भारत व ड्रग फ्री नागपूर अभियानांतर्गत खापरखेडा येथील सामूहिक विवाह सोहळ्यात नवविवाहित जोडप्यांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.गाडगे बाबा बहुद्देशीय संस्था, भंडारा आणि उत्कर्ष बहुउद्देशीय संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने साहिल सभागृहात २२ आंतरजातीय विवाह नोंदणी पद्धतीने करण्यात आले. जिल्हा नशाबंदी मंडळाचे संघटक गौरव आळणे यांनी नशाबंदीची शपथ दिली. या वेळी महा. अंनिस कोराडी शाखा अध्यक्ष ताराचंद पखिडे, चंद्रगुप्त रंगारी, ताराबाई गौरखेडे, ईशान मानवतकर, सुशांत बोरकर तसेच संबंधित विभागांचे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला १५० हून अधिक नागरिकांनी उपस्थिती नोंदवली.

### आगरकर व एन. डी. पाटील यांना अभिवादन

**गडचिरोली :** अंनिस गडचिरोली शहर शाखेच्या वतीने थोर समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर (१४ जुलै) व ज्येष्ठ विचारवंत, समाजसेवक एन. डी. पाटील (१५ जुलै) यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपाध्यक्ष वामनराव भोयर होते.प्रमुख पाहुणे म्हणून महा अंनिसचे ज्येष्ठ सल्लागार पंडित पुडके, प्रा. मांतेशकुमार तोंडरे आणि राज्य सरचिटणीस विलास निंबोरकर उपस्थित होते. पुडके यांनी एन. डी. पाटील यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याचा आढावा घेतला. प्रा. तोंडरे यांनी आगरकर आणि टिळक यांच्यातील विचारभिन्नतेवर सविस्तर भाष्य केले. कार्यक्रमात हरिदास कोटरंगे यांनी आधुनिक वारकरी वर्गावर आधारित कविता सादर केली, तर पुरुषोत्तम ठाकरे यांनी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या जीवनकार्यावर आधारित अभिवादन गीत सादर केले. सूत्रसंचलन उपाध्यक्ष उपेंद्र रोहनकर यांनी, तर आभारप्रदर्शन युवा सहभाग प्रमुख शितल मानकर यांनी केले.या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रा. मांतेशकुमार तोंडरे यांच्यासोबत धानोरा तालुक्यातील त्यांच्या महाविद्यालयात महा अंनिसची शाखा स्थापन करणे, युवा वाहिनी सुरू करणे, विज्ञानबोध कार्यक्रम, स्वअभ्यास परीक्षा यांसारख्या उपक्रमांची सविस्तर चर्चा झाली. त्यांनी या उपक्रमांसाठी सहकार्याची तयारी दर्शवली. कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे यांनी केले होते. महा अंनिसचे अनेक कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

•

## महा. अंनिसचे विविध उपक्रम



कोल्हे कुटुंबीयांकडून देणगी स्वीकारताना
डॉ. ठकसेन गोराणे व साथी



सामाजिक न्याय दिन (भंडारा)
विष्णूदास लोणारे, युवराज खोब्रागडे, चंद्रशेखर भिवगडे व साथी



जिल्हा कार्यकर्ता मेळावा (नवी मुंबई)
मच्छिंद्रनाथ मुंडे, अरविंद सोनटक्के, अशोक निकम व साथी



समाजिक न्याय दिन, उर्जानगर (चंद्रपूर)
दुरेंद्र गेडाम, नारायण चव्हाण, देवराव कोंडेकर व साथी



सामाजिक न्याय दिन, कढोली (गडचिरोली)
यशवंत इंदूकर, बंडूभाऊ बनसोड, गंगाधर लोनबले व साथी



जिल्हा कार्यकारिणी बैठक (भंडारा)
गजेंद्र सुरकार, विलास निंबोरकर, विष्णूदास लोणारे व साथी



सामाजिक न्याय दिन, लासूर स्टेशन (छ. संभाजीनगर)



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन (नागपूर)
गौरव आळणे, ताराचंद पखिडे, बबन गायकवाड व साथी

ISSN : 2584-0398 Registered News Paper
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष चौथे अंक आठवा, ५ ऑगस्ट २०२५ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/-
Andhshradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 4 Issue 8, 5th August 2025 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

विज्ञान निर्भयता नीती

ISSN : 2584-0398

R.N.I.No. MAHMAR/2022/83669

**वर्षभरात वार्षिक विशेषांक आणि १० मासिक अंक मिळवा घरपोच**

**बँक तपशील**

वर्गणी/जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट
**'विवेक जागर संस्था'** या समितीच्या प्रकाशन संस्थेच्या नावानेच काढावा.

सोबतचा QR कोड स्कॅन करुन
जाहिरातदार/देणगीदार/वर्गणीदार होऊ शकता

Scan & Pay

**VIVEK JAGAR SANSTHA**
ICICI Bank, Mundada Market, Dhule
A/c No.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R



वार्षिक वर्गणीदार व्हा!
व्यक्तीसाठी रु. ४००/-
संस्थेसाठी रु. ५००/-

- संपर्क – व्यवस्थापकीय संपादक : अजय भालकर (९३५९०८०८२०) अंक वितरक : आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- सहकाऱ्यांना मासिकाचे वर्गणीदार व वाचक बनवा तसेच जाहिरात व देणगीरूपाने मदत करा.
- प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टाने अंक रवाना केला जातो. अंक १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास संपर्क करा.
- अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामध्ये आपला सहभाग सर्व पातळींवर वृद्धिंगत व्हावा हीच अपेक्षा.
- अंकासाठी लेखन साहित्य manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in या ईमेलवर पाठवावे.

**कार्यालयीन पत्ता**
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली - ४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in

**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ______________________

______________________

______________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.